## रायगडात शासकीय युनानी महाविद्यालयाचा मार्ग मोकळा

**मुंबई :** महाराष्ट्रात शासकीय अनुदानित तीन व खासगी विनाअनुदानित चार अशी एकूण सात युनानी महाविद्यालये आहेत, पण एकही शासकीय युनानी महाविद्यालय नसल्याने राज्यात शासकीय युनानी महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला असून पहिले महाविद्यालय रायगड जिल्ह्यात सुरू करण्यात येणार आहे. १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे व संलग्नित १०० रुग्णखाटांचे रुग्णालयही स्थापन करण्यात येणार आहे. दरम्यान, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेच्या मानकानुसार नवीन युनानी महाविद्यालय सुरू करण्यासाठी किमान एक वर्षापासून कार्यरत रुग्णालय असणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन शासकीय युनानी महाविद्यालय सुरू करण्यासाठी म्हसळा तालुक्यातील रुग्णालये तात्पुरत्या स्वरूपात किमान तीन वर्षासाठी वापरण्यास वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने मान्यता दिली आहे. त्यामुळे रायगडात युनानी महाविद्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १६३

www.ramprahar.com

रविवार, २९ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


'सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कामांना गती देताना गुणवत्ता राखा'/२

'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४

नितीश-वॉशिंग्टनची मेलबर्नमध्ये झुंझार खेळी/८


### बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण

# फरार आरोपींची संपत्ती जप्त करा

### मुख्यमंत्री फडणवीसांचे आदेश



**मुंबई : प्रतिनिधी**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात जे आरोपी फरार आहेत, त्यांची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक बुरडे यांना दिले आहेत.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी फरार आहेत. आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी शनिवारी (दि. २८) बीडमध्ये सर्वपक्षीय एकवटले होते. आरोपींना तत्काळ अटक करत फाशी देण्यात यावी, अशी मागणी या वेळी सहभागी झालेल्या नेत्यांनी केली. या मोर्चात माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील, आमदार अभिमन्यू पवार, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड सहभागी झाले होते.

दरम्यान, सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात जे आरोपी फरार आहेत, त्यांची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करा, असे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक बुरडे यांना दिले. त्याचप्रमाणे बंदुकी सोबत ज्यांचे-ज्यांचे फोटो आहेत, ते जर खरे असतील तर त्या सर्वांचे परवाने रद्द करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करा, असेही आदेश मुख्यमंत्र्यांनी बीडच्या पोलीस अधीक्षकांना दिले आहेत. शिवाय तातडीने फेरआढावा घेण्यासही सांगण्यात आले आहे.

दुसरीकडे कल्याण एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करत तिच्यावर लैंगिक अत्याचार व खून केल्याचा प्रकार काही दिवसांपूर्वी समोर आला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपी विशाल गवळीला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणातील पीडितेच्या वडिलांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची शनिवारी भेट घेतली. या वेळी मुख्यमंत्र्यांनी तुम्ही घाबरू नका, सरकार तुमच्या पाठीशी आहे. येत्या दोन ते तीन महिन्यांत आरोपीला फाशी होणार, असे आश्वासन दिल्याची प्रतिक्रिया पीडितेच्या वडिलांनी दिली.

# डॉ. मनमोहन सिंग पंचत्वात विलीन

■ राष्ट्रपती मुर्मू, पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार





**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर शनिवारी (दि. २८) दिल्लीतील निगम बोध घाटावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

मनमोहन सिंग यांचे पार्थिव सकाळी ८ वाजता त्यांच्या निवासस्थानावरून काँग्रेस मुख्यालयात आणण्यात आले. यानंतर पार्थिव काही तास काँग्रेस कार्यालयात ठेवण्यात आले होते. तेथेही नेते, सामान्य जनता व कार्यकर्त्यांनी त्यांना आदरांजली वाहिली. अखेर पार्थिव निगम बोध घाटावर नेण्यात आले. तेथे त्यांच्या मुलींनी अंत्यसंस्कार केले.

मनमोहन सिंग यांचे २६ डिसेंबरच्या रात्री निधन झाले होते. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ९२ वर्षांचे होते. सन २००४ ते २०१४पर्यंत ते देशाचे पंतप्रधान होते व देशाच्या अर्थव्यवस्थेत त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

सिंग यांना शेवटचा निरोप घेण्यासाठी अनेक राजकीय नेत्यांनी उपस्थिती दर्शविली. या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले.

## आमदार रवींद्र चव्हाण भाजप संघटन पर्वचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी



**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप संघटन पर्वचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी म्हणून माजी मंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार चव्हाण यांच्या नियुक्तीचे पत्र प्रसिद्धीस दिले आहे.

डोंबिवलीचे आमदार रवींद्र चव्हाण हे मागील सरकारमध्ये सार्वजनिक बांधकाममंत्री म्हणून कार्यरत होते. यंदा डोंबिवलीतून ते चौथ्यांदा विजयी झाले आहेत. त्यांना भाजप संघटन पर्वचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. प्रदेशाध्यक्षपदावर नियुक्ती होईपर्यंत चव्हाण यांच्यावर विशेष जबाबदारी देण्यात आली आहे, तर प्रदेशाध्यक्षांप्रमाणेच त्यांच्याकडे अधिकार राहणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

# बीसीटी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरण द्रोणागिरी नोड येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.



शाळेने केलेल्या कामगिरीबद्दल आणि मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा अभियानात मिळवलेल्या यशाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले तसेच भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

वार्षिक स्नेहसंमेलनाला प्रमुख मान्यवर म्हणून सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहूल, वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र मिसाळ, दिलीप चव्हाण, विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, शाळा कमिटी मेंबर शेखर तांडेल, सुनील पाटील, सुरेश पाटील, स्नेहल पाटील यांच्यासह पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयाने २०२३-२४मध्ये मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा या अभियानात तालुकास्तरीय द्वितीय, तर २०२४-२५मध्ये प्रथम क्रमांक मिळवला याचा उल्लेख मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी प्रास्ताविकात केला. या स्नेहसंमेलनात गुणवंत विद्यार्थी तसेच शाळेचे शिक्षक व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## निवडक

### दिल्लीत आपची योजना वादात; राज्यपालांकडून चौकशीचे आदेश

**नवी दिल्ली :** येथील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आम आदमी पक्षाने सादर केलेली महिला सन्मान योजना वादात अडकली आहे. सरकारकडून या योजनेसाठी महिलांची नोंदणी केली जात असताना दुसरीकडे सरकारच्याच महिला व बालकल्याण विभागाने अशी कोणतीही योजना राबवली जात नाहीये, असे म्हटले आहे. भाजप व काँग्रेसने या योजनेबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. दरम्यान, राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनी या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

### दिग्दर्शिका सई परांजपे यांना पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार


**छत्रपती संभाजीनगर :** सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शिका, पटकथाकार, निर्मात्या, लेखिका व नाटककार पद्मभूषण सई परांजपे यांना जाहीर झाला आहे. अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात तो प्रदान करण्यात येणार आहे.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज व्यावसायिक विमान करणार लँडिंग

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम पूर्ण होत आले आहे. काही दिवसांपूर्वी या विमानतळावर वायुदलाचे सी २९५ आणि सुखोई ३० या विमानांच्या यशस्वी लँडिंगनंतर आता रविवारी (दि. २९) इंडिगो ए ३२० या पहिल्या व्यावसायिक विमानाचे लँडिंग होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

देशातील पहिले ग्रीन विमानतळ म्हणून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची उभारणी केली जात आहे. विमान सुरक्षा प्राधिकरणाच्या परीक्षण अधिकाऱ्यांचे पथक मुंबईतून उडणाऱ्या इंडिगो एअरलाईन्सच्या प्रवासी वाहतूक विमानातून प्रवास करत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणार आहे.



दरम्यान, नवी मुंबई विमानतळावर नवीन वर्षात पहिली धावपट्टी सुरू करण्यात येणार असून त्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. नवव्या वर्षात या विमानतळावरील पहिली धावपट्टी सुरू होईल, तर मार्चमध्ये हे विमानतळ नियमित प्रवासी सेवेसाठी सुरू होणार आहे.

नवी मुंबई विमानतळ ११.०४ किलोमीटर परिसरात उभे राहत असून येथे दोन धावपट्ट्या असणार आहेत. पहिल्या टप्प्यात चार टर्मिनल असणार असून ४२ विमाने उभी राहतील अशी व्यवस्था करण्यात येत आहे, तर पाच हजार ५०० क्षमतेची कार पार्किंग असेल. या विमानतळावरून दरवर्षी नऊ कोटी प्रवासी वाहतूक होईल, अशी अपेक्षा आहे.

### रोजगार निर्मितीच्या संधी

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये रोजगार निर्मितीची मोठी क्षमता आहे. विमानतळ पूर्ण झाल्यानंतर कुशल आणि बिगर कुशल कामगारांसाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. लॉजिस्टिक्स, ट्रेडिंग-फॉरवर्डींग, हॉस्पिटॅलिटी, किमती वस्तू उत्पादन, बीपीओ इत्यादी क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मिती होईल. लाखो तरुणांना रोजगारांच्या विविध प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संधी मिळणार आहेत.

### कार अपघातात मजूर ठार, अभिनेत्रीसह तीन जण जखमी

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी अभिनेत्री उर्मिला कोठारे यांच्या कारचा कांदिवलीत अपघात झाल्याची घटना शनिवारी (दि. २८) कांदिवली पूर्व परिसरात ही घडली. या अपघातात एका मजुराचा मृत्यू झाला आहे, तर दुसरा मजूर, उर्मिला आणि कार चालक हे जखमी आहेत.

उर्मिला शूटिंग संपवून घरी परतत असताना हा अपघात घडल्याचे सांगण्यात येत आहे. वेग जास्त असल्याने चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि भरधाव वेगाने जात असलेल्या कारने रस्त्याच्या कडेला काम करणाऱ्या दोन मेट्रो कर्मचाऱ्यांना धडक दिली. समतानगर पोलिसांनी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## पुण्यातून अपहरण केलेल्या युवतीची खालापुरातून सुटका

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील अल्पवयीन युवतीचे एकतर्फी प्रेमातून अपहरण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. पोलिसांनी युवतीची रायगड जिल्ह्यातील खालापूर परिसरातून सुटका केली. पोलीस मागावर असल्याची माहिती मिळाल्यानंतर आरोपी पसार झाले. या प्रकरणी यश कातुर्डे याच्यासह साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत युवतीच्या आईने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार युवती अल्पवयीन आहे. गुरुवारी युवती आणि तिची आई धनकवडी भागातून निघाली होती. त्या वेळी दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी त्यांना अडविले. युवतीच्या आईला पिस्तूलासारखे दिसणारे शस्त्र दाखवून धमकावले. युवतीला धमकावून दुचाकीवर बसण्यास सांगितले. युवतीचे अपहरण करुन दोघे जण पसार झाले, असे फिर्यादीत म्हटले आहे.

आरोपी आणि युवती ओळखीचे आहेत. एकतर्फी प्रेमातून तिचे अपहण केल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तपास सुरू केला. आरोपी युवतीला घेऊन मुंबईला गेल्याची माहिती तसेच बसमधून पुन्हा पुण्याकडे येत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांचे पथक माग काढत खालापूरला पोहचले आणि युवतीची सुटका करण्यात आली. दरम्यान, पोलीस मागावर असल्याची माहिती मिळाल्यानंतर आरोपी तेथून पसार झाले. त्यांचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती सहकारनगर पोलिसांनी दिली.

# राज्यातील दुसरा कोस्टल रोड नवी मुंबईत

### विमानतळ आणि अटल सेतुला जोडला जाणार



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोस्टल रोड हा महाराष्ट्रातील सर्वात लक्षवेधी प्रकल्प आहे. मुंबई शहरात मरीन ड्राईव्ह येथील प्रिन्सेस स्ट्रिट फ्लायओव्हर ते वरळी सी-लिंक असा १०.५८ किमी लांबीचा कोस्टल रोड बांधण्यात आला आहे. मरीन ड्राईव्ह ते हाजीअलीपर्यंत ६.२५ किमीचा मार्ग प्रवाशांसाठी खुला झाला आहे. मुंबईप्रमाणेच आता महाराष्ट्रातील दुसरा कोस्टल रोड नवी मुंबईत बनवला जात आहे. हा कोस्टल रोड नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि अटल सेतुला जोडणार आहे.

नवी मुंबई विमानतळाचे काम प्रगतिपथावर आहे. हे विमानतळ प्रत्यक्षात कार्यान्वित झाल्यानंतर येथे पोहचण्यासाठी अनेक रस्ते निर्माण केले जात आहेत. नवी मुंबई कोस्टल रोडदेखील नव्या विमानतळाच्या कनेक्टिव्हीसाठी बांधला जात आहे. हा कोस्टल रोड थेट नवी मुंबई विमानतळाला जोडला जाणार आहे. यासह हा कोस्टल रोड अटल सेतुलादेखील कनेक्ट केला जाणार आहे. या कोस्टल रोडमुळे सायन-पनवेल महामार्गावरील वाहतुकीचा ताणसुद्धा कमी होणार आहे.

सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईत कोस्टल रोड उभारला जात आहे. प्रामुख्याने सायन-पनवेल मार्गाला नेरूळ ते खारघरदरम्यान दुसरा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी हा कोस्टल रोड उभारला जात आहे. या कोस्टल रोडमुळे पामबीच मार्गाबरोबर सायन-पनवेल महामार्गावरील वाहतूक कोंडी सुटणार आहे. भविष्यात नवी मुंबई विमानतळ आणि अटल सेतूकडे जाण्यासाठी नवीन मार्गाचा पर्याय कोस्टल रोड माध्यमातून उपलब्ध होईल.

### वाहतूक होणार सुकर

सिडकोच्या माध्यमातून नेरूळ जेट्टी ते खारघर असा किनारी मार्ग अर्थात कोस्टल रोड उभारला जात आहे. या कोस्टल रोडला सीआरझेडची परवानगी मिळाली आहे. या कोस्टल रोडची लांबी ९.६ किमी आहे. हा प्रस्तावित खारघर कोस्टल रोड खारघर सेक्टर १६ येथून सुरू होणार असून सायन-पनवेल महामार्गाला ओलांडून बेलापूर जेट्टीला जोडला जाणार आहे. तिथून पुढे पाम बीच मार्ग पार करून नेरूळ जेट्टीपर्यंत जाणार आहे. खारघर-बेलापूर-नेरुळ असा हा कोस्टल रोड सायन-पनवेल रोडसाठी नवीन दुवा ठरणार आहे. यामुळे नवी मुंबईतील वाहतूक सुकर होणार आहे.

## रायगडात गावठी वालाच्या पिकाला बहर



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील पोपटीसाठी प्रसिद्ध अशा गावठी वालाचे पीक शिवारात बहरू लागले आहे. दीड-दोन महिन्यात गावठी वालाच्या शेंगा खवय्यांना मिळणार आहेत. सध्या येथील शेतकरी वालाच्या पिकाची काळजी घेताना दिसत आहे.

थंडीच्या हंगामात वेध लागतात ते वालाच्या शेंगांच्या पोपटी पार्टीचे. त्यासाठी पावसाळा संपल्यानंतर दिवाळीच्या दरम्यान वालाचे पीक घेणारे शेतकरी शेतीची मशागत करून पेरणी करतात. दोन महिन्यानंतर आता वालाच्या शेंगा देणारी रोपटी बहरू लागली आहेत. सरत्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षाच्या स्वागताला पोपटी पार्टीची जोड असते. यंदा वालाची उशिराने लागवड झाल्याने सध्या पावट्याच्या शेंगांवर खवय्यांना पोपटी पार्टी करावी लागणार आहे.

जिल्ह्यात वालाच्या शेंगांची पोपटी पार्टी ही खवय्यांना पर्वणीच असते. वालाच्या शेंगा तयार झाल्यानंतर सुरुवातीला चढ्या भावाने विक्री होत असली तरी पोपटी पार्टीची हौस भागविण्यासाठी मिळेल त्या भावाने शेंगा खरेदी केल्या जातात. या वालाच्या शेंगा तयार व्हायला अजून एक ते दीड महिना म्हणजे फेब्रुवारीच्या दरम्यान येत असतात. त्यानंतर वालाच्या शेंगांचे पीक येण्यास सुरुवात होईल असा अंदाज वालाची शेती लावणारे शेतकरी व्यक्त करीत आहेत.

वालाची पेरणी करून संपूर्ण शेतीला सुरक्षेसाठी कुंपण घालून दिवस-रात्र राखण करावी लागते. चांगले पीक येण्यासाठी धुक्याची गरज असते, मात्र सध्याच्या परिस्थितीत ऋतूमध्ये कधीही बदल होत असल्याने यावर मात करून रोपांची काळजी घ्यावी लागते. वातावरणात बदल झाला की काळजी लागून राहते, परंतु प्रत्येक वर्षाला किमान आठ ते दहा मण वालचे पीक घेता येते, असे धामणी येथील शेतकरी मयूर धुमाळ यांनी सांगितले.

# सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कामांना गती देताना गुणवत्ता राखा -मुख्यमंत्री

महाराष्ट्राला कृषी, वीज निर्मिती, उद्योग आणि सेवा क्षेत्रात आणखी पुढे घेऊन जाण्यासाठी सौर ऊर्जेवर भर देण्यात येत आहे. त्यामुळे राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कामांना गती देतानाच त्यामध्ये गुणवत्ता राखण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री राज्य अतिथिगृहातझाली. .मुख्यमंत्री म्हणाले की,



महाराष्ट्राला ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवायचे आहे. त्यासाठी विजेशी संबंधित सर्व कंपन्या सुस्थितीत आणाव्या लागतील. भविष्यात त्यात जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांचे लिस्टिंग करण्याबाबत विचार करावा लागेल. ऊर्जा विभागांतर्गत कार्यरत कंपन्यांबाबत येणाऱ्या तक्रारी कालमर्यादेत सोडविण्यासाठी जिल्हा, विभाग स्तरावरील यंत्रणा सक्षम करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीस ऊर्जा राज्यमंत्री तथा मंडळाच्या उपाध्यक्ष मेघना बोर्डीकर, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक आभा शुक्ला, संचालक लोकेश चंद्रा, राधाकृष्णन बी., अनुदीप दिघे, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, नीता केळकर आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# महामार्गावर वावेदिवाळीजवळ कारच्या धडकेत स्कुटीचालकाचा मृत्यू

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावर वावेदिवाळी या गावच्या हद्दी मध्ये शनिवार (दि.२८) रोजी दुपारी १२ वाजता मुंबई वरून महाडच्या दिशेने भरधाव वेगाने (ईनोवा) स्कि स्टाकारने धडक दिल्याने स्कुटी चालकाचा मृत्यु झाला आहे .

अनेक वर्षापासून मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्ग हा रखडलेला असून या महामार्गावरून कोकणात प्रवास करणाऱ्या प्रत्येकाला हा प्रवास म्हणजे तारेवरची कसरत करावी लागत आहे. सण , शनिवार व रविवार सुट्टीचे दिवस असले की कोकणात पर्यटकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढत असून अक्षरशः प्रवाशाना हा प्रवास मोठा खडतर बनत चालला आहे. मुंबई – गोवा हायवेला मोठ्या प्रमाणात अपघात होत असून अनेक निराअपराध नागरिकांचे जीव जाताना



दिसत आहे.

शनिवारी दुपारी १२ वाजता राष्ट्रीय महामार्गावर वावेदिवाळी या गावच्या हद्दी मध्ये मुंबई वरून महाडच्या दिशेने भरधाव वेगाने (ईनोवा) स्किस्टा कार क्रमांक एम एच ०३.सी.एस.३४९९ने माणगांवच्या दिशेने एम एच ०६ बी.एक्स १८८३ क्रमांकाची स्कूटी गाडी घेऊन जाणार्या राजाराम अनंता धारदेवकर (वय ६५) रा.चणेरा सध्या वास्तव्य महादेववाडी रोहा यांना पाठीमागून भारत सरकार पाटी असलेल्या ईनोवा किंस्टाकारने जोरदार धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही धडक एवढी जोरदार होती की स्कूटी चालकाच्या डोक्याला तसेच हाताला व पाठीमागे कमरेला खूप मोठा मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. माणगांव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीला माणगांव उप जिल्हा रूग्णालयात दाखल केले असून ईनोवा चालकास माणगांव पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास माणगांव पोलिस करत आहेत. मृत व्यक्तीच्या नातेवाईक यांनी सांगितले की, ईनोवा क्रीस्टा या गाडीचा चालक हा मद्यधूंद अवस्थेत होता. त्या गाडीत कोणीतरी अधिकारी देखील होते. हा अपघात होताच ते पळून गेले असा आरोप केला आहे

# विनापरवानगी जाहिरात फलक, होर्डिंग, बॅनरवर नवी मुंबई मनपा करणार धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

विनापरवानगी जाहिरात फलक, होर्डिंग, बॅनरवर

नवी मुंबई महानगरपालिका करणार धडक कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी संबधित विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांना दिले आहेत.

उच्च न्यायालयाने जनहित याचिकेवरील आदेशाच्या अनुषंगाने राज्यातील अनधिकृत जाहिरात फलक, होर्डिंग, बॅनर यांच्यावर करण्यात आलेल्या व करण्यात येत असलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, नवि–२ के.एच.गोविंदराज यांनी सर्व संबधित प्राधिकरणांची बैठक घेऊन मौलिक सूचना केल्या.

त्यास अनुसरुन नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आढावा बैठक घेत प्रधान सचिव महोदयांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे असे स्पष्ट निर्देश दिले. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात फलक, होर्डिंग, बॅनर लावण्यासाठी महानगरपालिकेने जागा निश्चित केल्या असून त्याच जागांवर, विहित आकारमानात जाहिरात फलक, होर्डिंग, बॅनर प्रदर्शित केले जातील याची खात्री संबधित विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी करुन घ्यावी असे आयुक्तांनी निर्देशित केले.

या फलकांवर अर्जदाराचे नाव, परवानगी क्रमांक, परवानगीचे ठिकाण, परवानगीचा कालावधी हा फलकाच्या आकारासह व क्यू आर कोडसह नमूद असावा असे आयुक्तांनी स्पष्ट केले. या व्यतिरिक्त आपल्या विभागीय क्षेत्रात कुठेही विनापरवानगी बॅनर लावले जाणार नाहीत याची काटेकोर दक्षता घ्यावी असेही निर्देश आयुक्तांनी दिले. विनापरवानगी फलक प्रदर्शित केलेला दिसल्यास त्यावर दंडात्मक व शहर विद्रुपीकरण कायद्याअंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात यावी असेही आयुक्तांनी स्पष्टपणे निर्देशित केले.

याबाबतच्या सूचना जाहिरात फलक, होर्डिंग, बॅनर छपाई करणा–या प्रिंटींग प्रेस यांनाही देण्यात याव्यात तसेच सर्व राजकीय पक्षांनी याबाबतचे हमीपत्र दाखल केलेले असल्याने नवी मुंबईतील सर्व राजकीय पक्ष प्रमुखांना याबाबत माहिती द्यावी असेही आयुक्तांनी सूचीत केले.

या अनुषंगाने विभागनिहाय स्थापित समितीची बैठक घेण्यात यावी तसेच या विषयी नागरिकांना सुलभपणे तक्रार करता यावी याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तक्रार निवारण प्रणाली कार्यरत असल्याचीही प्रसिध्दी करावी असेही आयुक्तांनी निर्देशित केले.

तरी ज्या नागरिक / संस्थांना जाहिरात फलक, होर्डिंग, बॅनर लावावयाचे असतील त्यांनी संबधित विभाग कार्यालयाची रितसर परवानगी घेवुन परवानगीत नमूद जागी व आकारात लावावेत असे आवाहन करतानाच याबाबत विनापरवानगी जाहिरात फलक, होर्डिंग, बॅनर लावलेले आढळल्यास त्यावर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५ चे कलमान्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल याचीही नोंद घ्यावी असे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

# वर्षाअखेरीस रेल्वेच्या प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर निर्बंध

**रोहे : प्रतिनिधी**

वर्षअखेरच्या कालावधीत प्रचंड गर्दीच्या अपेक्षेने, मध्य रेल्वेने निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरते निर्बंध लादले आहेत. प्लॅटफॉर्मवर होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन आणि स्थानक परिसरात प्रवाशांच्या गर्दीचे नियोजन करणे हे या निर्बंधाचे उद्दिष्ट आहे.

प्लॅटफॉर्म तिकिट विक्रीचे निर्बंध २९–१२–२०२४ ते ०२–०१–२०२५ च्या मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत लागू असतील.१४ स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्री प्रतिबंधित आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसदादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे, कल्याण, पनवेल, पुणे, नागपूर, नाशिक रोड, भुसावळ, अकोला, सोलापूर, कलबुरगि आणि लातूर या रेल्वे स्थानकाचा समावेश आहे. या निर्बंधातून विशेष सूट

वयोवृद्ध व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, लहान मुले, निरक्षर व्यक्ती आणि महिला प्रवासी ज्यांना एकट्याने प्रवास करता येत नाही अशांचा प्रवास सुलभ व्हावा या हेतूने सदर निर्बंधांमधून सूट देण्यात येत आहे.

वर्षअखेरीच्या कालावधीत सुरळीत व सुरक्षित प्रवास अनुभवासाठी प्रवाशांनी त्यानुसार नियोजन करावे आणि नवीन नियमांचे पालन करावे ही विनंती मध्य रेल्वे कडून करण्यात येत आहे.

# उकरुळ ग्रामपंचायत उपसरपंचपदी रुपाली थोरवे यांची बिनविरोध निवड

**कर्जत :प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील उकरुळ ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंचपदी भाजपच्या रुपाली धनंजय थोरवे यांची बिनविरोध निवड झाली. उपसरपंच शिवाजी गोसावी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.

उकरुळ ग्रामपंचायतीच्या रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी निवडणूक पिठासीन अधिकारी ग्रामपंचायतीच्या थेट सरपंच नीलिमा थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. पिठासीन अधिकारी यांच्याकडे उप सरपंच पदासाठी रुपाली धनंजय थोरवे यांचा एकमेव अर्ज निर्धारित वेळेत दाखल झाला. त्यामुळे विशेष बैठकीत



पिठासीन अधिकारी थेट सरपंच नीलिमा थोरवे यांनी ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून रुपाली थोरवे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी सुधीर लोहकरे यांनी सहकार्य केले.

या विशेष सभेला शिवाजी जानू गोसावी,विलास वसंत खडे, प्रियंका रोशन खडे, प्रमिला खडे, संदिप सावंत, सायली सुधीर भोईर आणि रुपाली थोरवे हे ग्रामपंचायती मधील सात सदस्य उपस्थित होते.

# वडगाव शाळेचा दप्तरमुक्त शनिवार उपक्रम; बालवैज्ञानिक घडविणार

**चौक : प्रतिनिधी**

वडगाव शाळेत,दप्तरमुक्त शनिवारसाठी ब्रेन कॅप बनविण्याचा उपक्रम घेतला.यावेळी मुलांनी व सर्व शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवत सहभाग नोंदवला. ४ थी ते ८ वी च्या मुलांनी कृतीयुक्त पद्धतीने तयार केलेल्या ब्रेन कॅप आज गावातील लोकांसाठी वेगळेच आकर्षण होते

रायगड जिल्हा परिषदेची ग्रामीण उत्कृष्ट शाळा,वडगाव या शाळेतील शिक्षक सुभाष राठोड यांनी अगस्त्या फाऊंडेशनने घेतलेल्या विज्ञान विषयाच्या प्रशिक्षणानंतर आज शाळेत,दप्तरमुक्त शनिवार साठी ब्रेन कॅप बनविण्याचा उपक्रम घेतला.यावेळी मुलांनी व सर्व शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवत सहभाग नोंदवला ४ थी ते ८ वी च्या मुलांनी कृतीयुक्त पद्धतीने तयार केलेल्या ब्रेन कॅप आज गावातील लोकांसाठी वेगळेच आकर्षण होते.सर्व मुले व शिक्षक डोक्यावर कॅप घेऊन शाळेतून निघाले,या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

वडगाव शाळा नेहमीच छान उपक्रम शोधून काढत असतात,त्यामुळे शाळेचे शैक्षणीक आकर्षण कायम राहते. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ.करुणा रविंद्र ठोंबरे यांनी सिप्ला कंपनी व अगस्त्या फाऊंडेशन कडून प्रशिक्षण घेतले,त्याचा मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी फायदा होत आहे,छोटे छोटे प्रयोग मुले आनंदाने करत आहेत.मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद माझ्यासाठी महत्त्वाचा आहे.असे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगितले.



# कर्जत शहरातील विजेचे खांब बदलण्याचे व दुरूस्तीचे काम सुरू



**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील तसेच वितरण कंपनीच्या उपकेंद्रात सडलेले आणि वाकलेले विजेचे खांब बदलण्याच्या तांत्रिक कामाकरीता वीज वितरण कंपनीने आठ तासाचा बंद घेवून काम सुरू केले आहे.

खोपोली ते भिसेगाव उपकेंद्रापर्यंत असलेल्या इनकमिंग लाईनवरील कंडक्टर बदलणे, त्याचें मजबुतीकरण करणे, उपकेंद्राच्या परिसरात असलेल्या झाडाच्या त्रासदायक फांद्या तोडणे, कर्जत शहरातील गंजलेले खांब आणि वाकलेले खांब बदलणे या तांत्रिक कामासाठी वीज वितरण कंपनीकडुन आठ तासाचा बंद घेण्यात आला होता,

याबाबतची पूर्वकल्पना काल सोशल मीडियावर मेसेजच्या माध्यमातून दिली होती. शहरात सुरू असलेल्या खांब बदलण्याच्या कामाची माहिती घेण्या विषयी वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत केंद्रे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी वीजवितरणीचे नेहमीचे काम सुरू असून या मेंटेनन्सचे काम सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# रस्त्याच्या वादात ठेकेदाराची शेतकऱ्याला मारहाण

**धाटाव :** रोहा तालुक्यातील बोरघर येथे आपल्या मालकीच्या जमिनीतून रस्त्याचे काम सुरू केल्याबद्दल जाब विचारला म्हणुन ठेकेदाराने शेतकऱ्यालाच केली मारहाण केल्याप्रकरणी रोहा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोरघर हद्दीत शासकीय स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम चालू आहे किशोर भगत या मालकांने सब ठेकेदार यांना विचारणा केली असता. त्याने लाकडी फाट्याने डोक्यात फटका मारल्याने मालकाच्या उजव्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली. भांडण सोडवण्यासाठी त्यांचा मोठा भाऊ गेला असता त्यालासुद्धा फाट्याने मारहाण केली .









**अलिबाग : सलग सुट्ट्या असल्याने रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळे पर्यटकांनी बहरली आहेत. अलिबाग, वरसोली समुद्रकिनारी उंटावरून सफारी, एटीएम बाईक राईडची मजाही पर्यटकांनी मनसोक्त लुटली.** (छाया : जितू शिगवण)

## निवडक

### कामोठे येथे गंठणची चोरी

**पनवेल :** बंद घरातून साडेचार तोळे वजनाची सोन्याची गंठणची चोरी झाल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे. सेक्टर २० येथे राहणारे सुदेव माने यांचे घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेली साडेचार तोळे वजनाची गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पराडे येथे फिरस्ता इसमाचा मृत्यू

**मोहोपाडा :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मौजे पराडे येथे अनोळखी फिरस्ता इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून याबाबत अभिजीत पाटील यांनी रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली आहे.अज्ञात फिरस्ता इसम हा पराडे येथील वॉशिंग सेंटरच्या रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या डिव्हायडर जवळ झोपलेला असता काही एक हालचाल करत नसल्याने त्याला उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय चौक येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या मृत इसमाची अकस्मात मृत्यू म्हणून रसायनी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक महेश धोंडे अधिक तपास करीत आहेत.

# सुरक्षेच्या दृष्टीने वाहनांना हाय सिक्युरिटी नंबरप्लेट गरजेची

## पनवेल आरटीओ कार्यक्षेत्राची झोन-१मध्ये विभागणी

**पनवेल : वार्ताहर**

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० नुसार, वाहनांस एचएसआरपी बसविण्यासाठी राज्य परिवहन आयुक्त यांच्या परिपत्रकानुसार वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणार्या वाहनांची ओळख पटविणे तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना हाय सेक्युरिटी नंबरप्लेट (एचएसआरपी) बसविणे अत्यावश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देशेही दिलेले असून या निर्देशांची अंमलबजावणी व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित झालेल्या सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविण्याबाबत अवगत केले आहे.

राज्यातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांची तीन झोनमध्ये विभागणी केलेली असून पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्राची झोन १मध्ये विभागणी करण्यात आलेली असून मे. रोसमेरटा सेफ्टी सिस्टम्स लि. या उत्पादकास/संस्थेस वितरक म्हणून प्राधिकृत केले आहे. सदरील हाय सेक्युरिटी नंबरप्लेट नंबरप्लेटसाठी ऑनलाईन बुकींग करण्यासंबधी https://mhhsrp.com या लिंकवरुन नोंदणी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यासाठी वाहनमालकाचे वाहन ज्या कार्यालयात नोंदणी झालेली आहे, त्या कार्यालयात जावून तसेच वाहन ४.० या संगणक प्रणालीवर ऑनलाईन मोबाईल क्रमांक अद्यावयत करण्यात यावा, याशिवाय हाय सिक्युरिटी नंबरप्लेट ऑनलाईन नोंदणी होणार नाही.

कोणत्याही परिस्थितीत, नियुक्त केलेले अधिकृत हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविणाऱ्या केंद्रावर वाहन मालकांना हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविण्याची सोय नाकारता येणार नाही.

वलप येथील महिलेची हत्या, दागिने चोरी प्रकरण

# पतीपाठोपाठ पत्नी आणि मुलीला अटक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वलप येथील संगीता आगवणे या महिलेची हत्या आणि दागिने चोरी केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपी शरद साहू याला अटक केली होती. दागिन्यांची विक्री केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीची पत्नी मंजुळा शरद साहू (वय ३९) आणि मुलगी सोनिया राहुल साकेत (वय २०) या दोघींना अटक केली. या दोघींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली.

संगीता आगवणे या महिलेच्या हत्येप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष २ यांनी हत्येतील आरोपी शरद साहू याला अटक केली. आरोपीने महिलेची हत्या करून दागिने व मोबाईल घेऊन पोबारा केला होता. त्यानंतर साहू याने मयत महिलेचे दागिने विकण्याचा प्रयत्न केला होता, मात्र ज्वेलर्सने त्याच्याकडून दागिने घेतले नाहीत. त्यानंतर ते दागिने त्याने पत्नी आणि मुलीला दिले. त्यातील काही दागिने त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी विकले आणि काही दागिने नव्याने बनवून वापरण्यासाठी घेतले.

पोलिसांनी शरद साहू याला अटक केली. चोरीच्या दागिन्यांबद्दल त्याच्याकडे चौकशी केली असता ते दागिने विकले असल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याची पत्नी आणि मुलगी यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून दागिने हस्तगत केले आहेत.

# गोव्यावरून येणाऱ्या वाहनांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर

**पनवेल : वार्ताहर**

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पनवेल नगरी सज्जहोऊ लागली आहे. काही दिवसांवर 'थर्टी फर्स्ट' आल्याने अवैध, चोरटी मद्य विक्री रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने गोवा वरून येणार्या वाहनावर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथके पनवेल परिसरात तैनात केली आहेत.



थर्टीफर्स्टला सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी तरुणाई सज्ज झाली आहे .पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात फॉर्महाऊस असल्यामुळे मित्रमंडळीकडून थर्टीफस्ट साजरा करण्यासाठी बेत आखले जात आहेत. विशेष म्हणजे गोवा येथे दारू स्वस्त उपलब्ध होत असल्यामुळे मित्र मंडळी तसेच चोरीने दारू विक्री करणारे दारू विक्रेते, चायनीज विक्रेते, ढाबा तसेच बहुतांश नागरिक हे गोवा वरून स्वस्त दरात मद्य घेवून येण्याची शक्यता अधिक असल्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाची मद्य तस्करावर करडी नजर राहणार आहे.

उत्पादन शुल्क विभागाने गोवावरून येणाऱ्या वाहनावर नजर ठेवण्यासाठी पथक तयार केले आहे. विशेष म्हणजे पनवेल पालिका हद्दीत अवैधपणे दारू विकेत्यांवर कारवाईसाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून नियोजन करण्यात आले आहे.

> **गोवावरून पनवेल ,नवी मुंबई, ठाणे व मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणात बसेस येतात. विशेष थर्टीफर्स्टसाठी लागणारे मद्य वाहनातून घेवून येतात. त्यामुळे गोवावरून येणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यासाठी सात कर्मचारी, अधिकाऱ्यांचे पथक तैनात करण्यात आले असून रात्री दोन-तीन वाजेपर्यंत वाहनांची तपासणी केला जात आहे.**
>
> **- कृष्णा देवरे, अधिकारी राज्य उत्पादन शुल्क पनवेल**

## पान शॉप आणि जनरल स्टोअर्समध्ये चोरी

**पनवेल** : शहरातील परदेशी आळी येथे असणार्या शौकीन पान शॉप आणि जनरल स्टोअर्समध्ये चोरी झाल्याची घटना घडली आहे. सदर पान शॉपचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करुन दुकानातील रोख रक्कमेसह इतर साहित्य मिळून असा जवळपास ४० हजाराच्या आसपास मुद्देमाल चोरुन नेला आहे. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले व त्यांनी पुढील तपास सुरू केला आहे.



# मोहोपाड्यात मोफत नेत्र तपासणी शिबिराला प्रतिसाद



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोतिबिंदूमुक्त मोहोपाडा, रसायनी अभियानांतर्गत नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल आणि रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने वासांबे ग्रामपंचायतीच्या शिवांजली इमारतीच्या सभागृहात मोफत नेत्र तपासणी आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन शनिवार (दि.२८) रोजी करण्यात आले होते. त्यास नेत्ररुग्णांचा प्रतिसाद लाभला.

या शिबिराचे उद्घाटन सरपंच उमा मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन थोरात, गणेश काळे, बाळकृष्ण होनावले, गणेश वर्तक, विजय पाटील, सुनील भोसले, शानबाग, अमित शहा, माजी सरपंच संदीप मुंढे, सदस्य केदार भोईर, डॉ.विलास पाटील आदी उपस्थित होते.

या शिबिरात ९० रुग्णांनी मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. यात ४० रुग्णांना मोतिबिंदूचा त्रास असल्याचे तपासणीत दिसून आले. त्यांच्यावर नवीन पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटलात शस्त्रक्रीया करण्यात आली. शिबिर यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ओम पाटीलचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ओम योगेश पाटील याचा त्याने बॉक्सिंग चॅम्पियनशिप मिळवलेल्या यशाबद्दल शुक्रवारी (दि. २७) त्याचा सत्कार करण्यात आला. उरण द्रोणागिरी येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात हा सत्कार झाला.




भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाच्या इयत्ता नववीत शिकणाऱ्या ओम पाटील याने महाराष्ट्र राज्य किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२४मध्ये १४ वर्ष वयोगटात लाईट कॉन्टेक्ट व पॉईन्ट फाईटमध्ये कांस्यपदक, तर इंटरनॅशनल ओपन कराटे चॅम्पियनशिप २०२४मध्ये १४ वर्ष वयोगटामध्ये कुमित या प्रकारात सुवर्णपदक मिळवले. याशिवाय काता या प्रकारात रौप्यपदक जिंकले आहे.

विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ओमचा सत्कार करण्यात आला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत, पनवेलच्या माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका, ओमचे आई- बाबा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



**पनवेल : जय हनुमान क्रिकेट संघ वलप यांनी आयोजित केलेल्या आमदार चषक क्रिकेट स्पर्धेला भाजप उत्तर रायगड जिल्हा ओबीसी मोर्चा सोशल मीडिया प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, सदस्य उमेश वनगे यांनी भेट दिली. स्पर्धेचे आयोजक अंकुश पाटील व सहकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.**

# सिटीजन्स युनिटी फोरम संस्थेचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन साजरा

**पनवेल : प्रतिनिधी**

माणसाने आवडते काम मिळवण्याचा जरूर प्रयत्न करावा. पण आवडते काम मिळालेच नाही तर नाराज ना होता मिळालेल्या कामात आनंद शोधण्याचा प्रयत्न करावा, असे भावपूर्ण उद्गार योगेश जोशी यांनी काढले. येथील सिटीजन्स युनिटी फोरम संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनाच्या प्रसंगी सादर करण्यात आलेल्या 'हसू आणि आसू' या लोकप्रिय कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, पदरी पडलेले काम आनंदवृत्तीने पार पाडल्याने कार्यपूर्तीचे समाधान आपल्याला तर मिळतेच,पण या वृत्तीचा जीवनात आपली प्रगती करून घेण्यात उपयोग होतो. नंतर त्यांनी दैनंदिन जीवनातील विनोदी किस्से व मनुष्य स्वभावाचे विविध नमुने सादर केले.

सुमारे दोन तास चाललेला हा कार्यक्रम सतत हास्याचे फवारे उडवीत राहिला. भाषेचे सौंदर्य खुलवीत हसता हसता अंतर्मुख करताना सामाजिक भान जागृत करून चला जगू आनंदेहा संदेश देणारा हा कार्यक्रम होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. प्रमुख वक्ते योगेश जोशी, कफचे माजी अध्यक्ष अरुण भिसे, संस्थेचे संस्थापक सदस्य डॉक्टर भगवान बिरमोळे, सिटीजन्स युनिटी फोरमचे अध्यक्ष संदीप शिंदे, खजिनदार विलास दातार, यांनी दीप प्रज्वलन केले. मनोहर लिमये यांनी संस्थेच्या स्थापनेपासून ते आज पर्यंतच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेतला. पाहुण्यांनी आपला सार्थ परिचय स्वतःच्या भाषणातून खुसखुशीत शैलीत करून दिला.

या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, कफचे सभासद गायक नरेश पाटील, कार्यकारी अधिकारी सौ. पुंड, कफ कामोठ्याच्या रंजना सडोलीकर, कफकन्या अभिनेत्री अनुपमा ताकमोगे व पनवेल शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे या सर्वांचा सत्कार करण्यात आला.

येथील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटीच्या मैदानातील गणेश मंदिराजवळील सभागृहात हा कार्यक्रम साजरा झाला. पनवेल शहरातील अनेक मान्यवर श्रोत्यांनी सभागृह भरले होते. मनोहर लिमये यांच्या आभार प्रदर्शनानंतर या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाची सांगता झाली.



# वाढदिवस अभीष्टचिंतन!



**भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते तथा पुनाडे ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य रसिक बाबुराव पाटील यांचा वाढदिवस आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत साजरा झाला. या वेळी उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, कामगार सेलचे अध्यक्ष जितेंद्र घरत, बुथ अध्यक्ष संदेश पाटील, आवरे गावचे युवा नेते धनेश गावंड आदी उपस्थित होते.**

# श्याम बेनेगल

## आशय अन् पोस्टर्सचे वैशिष्ट्य जपणारे दिग्दर्शक

झूम प्रहर




दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

अंकूर असो की निशांत वा मंडी... चित्रपटाचे नाव घेताच त्या चित्रपटाचे दिग्दर्शक श्याम बेनेगल आहेत यापासून त्या चित्रपटाचे एकूणच व्यक्तिमत्व, त्याचा आशय, त्याचा प्रभाव असे सगळेच आपल्या डोळ्यासमोर येते हे वैशिष्ट्यपूर्ण. चित्रपट माध्यम व व्यवसायातील हीदेखील एक उल्लेखनीय गोष्ट. श्याम बेनेगल (जन्म १४ डिसेंबर १९३४. मृत्यू २३ डिसेंबर २०२४) यांच्या चौफेर वाटचालीवर फोकस टाकावा तेवढा थोडाच. भारतीय चित्रपटसृष्टीची दिशा बदलणारा दिग्दर्शक यापासून ते समांतर चित्रपट प्रवाहातील खंदा उद्गाता यापर्यंत बरेच काही सांगता येईल. १४ डिसेंबर रोजी आपल्या वयाचा नव्वदावा वाढदिवस ताडदेव येथील आपल्या स्टाफसोबत साजरा करणारे श्याम बेनेगल आणखी काही दिवसांतच म्हणजे २३ डिसेंबर २०२४ रोजी आपला जीवन प्रवास थांबवतात हे स्वीकारणे तसे बरेच जडच, पण सतत कार्यमग्न असणारा असा एक न थांबणारा दिग्दर्शक ही त्यांची ओळख कायम राहिल. विशेषत: चित्रपट माध्यम व व्यवसाय याचा गंभीरपणे विचार करणारा असा चित्रपटसृष्टी, प्रसारमाध्यम आणि चित्रपट रसिक यातील वर्ग हे कायमच श्याम बेनेगल यांच्या कसदार कलात्मक कलाकृतींशी जोडलेले राहतील.

श्याम बेनेगल यांच्या अगणित वैशिष्ट्यांतील एक म्हणजे त्यांच्या दिग्दर्शनातील विषयानुसारची त्यांच्या चित्रपटांची पोस्टर. त्यांनी १९५९ साली आपल्या कारकीर्दीची सुरुवात लिंटास ॲडव्हर्टायझिंग या जाहिरात एजन्सीत केली, त्यातून ते जाहिरातपटाकडे वळले आणि मग सतत नवीन गोष्टी शिकत व घडवत घडवत चित्रपट माध्यमापर्यंत आले. भारतातील ग्रामीण भागातील जीवनावर आधारित चित्रपट हे त्यांचे विशेष उल्लेखनीय वैशिष्ट्य. ते करताना त्यांनी आपल्या चित्रपटांच्या पोस्टरवरही विशेष लक्ष दिल्याचे दिसून येते. सत्तरच्या दशकात रस्त्यावरील चित्रपटांची पोस्टर व होर्डिंग्ज ही जनसामान्यांपर्यंत चित्रपट पोहचवण्याची अतिशय प्रभावी व महत्त्वाची माध्यमे होती. पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपटांची अतिशय हाऊसफुल्ल गर्दीत वाटचाल सुरू होती. बस स्टॉपपासून रेल्वे स्टेशनपर्यंत सगळीकडे पोस्टर्सची गर्दी होती. त्यात आपल्या चित्रपटाची वेगळी ओळख निर्माण झाली तरच प्रेक्षक चित्रपटगृहात येत. याचं भान अथवा व्हीजन खुद्द दिग्दर्शकांनाही असणे आवश्यक आहे. चित्रपट फक्त चित्रपटगृहावर लागतो, पडद्यावर घडतो/दिसतो/असतो असे नाही तर तो पोस्टरपासूनच दिसायला लागतो. अशी सर्वव्यापक दृष्टिकोन असणाऱ्या दिग्दर्शकांत चित्रपती व्ही. शांताराम (दो आँखे बारह हाथ, झनक झनक पायल बाजे, गीत गाया पत्थरोंने, नवरंग, पिंजरा इत्यादी), राज कपूर (बरसात, आग, आवारा, संगम, मेरा नाम जोकर, बॉबी इत्यादी), मेहबूब खान (अंदाज, मदर इंडिया, आन इत्यादी), के. असिफ (मुगल-ए-आझम), गुरुदत्त (प्यासा, कागज के फूल इत्यादी), राज खोसला (वह कौन थी, मेरा साया, मेरा गांव मेरा देश, दो रास्ते, प्रेम कहानी इत्यादी), विजय आनंद (नौ दो ग्यारह, तेरे घर के सामने, गाईड, ज्वेल थीफ, जॉनी मेरा नाम, तेरे मेरे सपने इत्यादी), बासू भट्टाचार्य (अनुभव, गृहप्रवेश, आविष्कार, आस्था इत्यादी), गुलजार (अचानक, मौसम, आंधी, किताब, किनारा इत्यादी), गोविंद निहलानी (अर्धसत्य, द्रोहकाल, देव इत्यादी), रवींद्र धर्मराज (चक्र) अशा दिग्दर्शकांनी आपल्या चित्रपटाच्या पोस्टर डिझाईनचे वैशिष्ट्य कायमच जपले. श्याम बेनेगल यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांबाबतही हेच दिसते. (हा एकूणच हा विषय काहीसा दुर्लक्षित का बरे राहिला असेल?)

सत्तरच्या दशकात दाग, जंजीर, आप की कसम, प्रेम नगर, दीवार, प्रतिज्ञा, रोटी कपडा और मकान, शोले, जानेमन, अमर अकबर ॲन्थनी, त्रिशूल, धरमवीर, आझाद, दुल्हन वही जो पिया मन भाये, छैला बाबू, मुकद्दर का सिकंदर, लावारीस, रेड रोझ, ज्योती बने ज्वाला अशा मसाला मिक्स मनोरंजन चित्रपटांच्या पोस्टर गर्दीत आपल्या दिग्दर्शनातील चित्रपट हरवून जाऊ नये याची पहिली खेळी त्याचे पोस्टर हेच आहे याची जाणीव श्याम बेनेगल यांना असल्याचे कायमच 'दिसून' आले आहे आणि या चित्रपटांच्या प्रेक्षकांतून आपल्या चित्रपटांकडे प्रेक्षक वळवणे हेही आवश्यक होतेच. आपल्या देशात समांतर चित्रपट अथवा नवप्रवाहातील चित्रपट रुजण्याचे अधिकाधिक श्रेय श्याम बेनेगल यांजकडे जाते, पण त्यासाठी त्यांनी बहुस्तरीय काम केले हेदेखील सांगायला हवे. त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांची पोस्टर बोलत/सांगत हे आवर्जून दिसतेय. अंकुर (१९७३), निशांत (१९७५), मंथन (१९७६), भूमिका (१९७७) जुनून (१९७८), कलयुग (१९८१), मंडी (१९८३), त्रिकाल (१९८५), यात्रा (१९८६), सुस्मन (१९८७), मम्मो (१९९४), सरदारी बेगम (१९९६), समर ( ९९९), झुबैदा (२००१), सूरज का सांतवा घोडा (१९९२), बॉस द फॉरगॉटन नेताजी बोस (२००५), वेलकम टू सज्जनपूर (२००८), वेल डन अब्बा (२०१०), मुजीब द मेकिंग ऑफ नेशन अशी त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांची नावेच त्यांच्या चित्रपटांची पोस्टर व आशय पटकन डोळ्यासमोर आणतात. या त्यांच्या अतिशय वेगळेपणाची दखल घ्यायलाच हवी. समांतर चित्रपटाचा प्रवाह रूजवण्यात अनेक अडथळे होतेच. सर्वप्रथम प्रश्न होता तो आर्थिक पाठबळाचा, अशा चित्रपटांना वितरक मिळण्याचा (यातील काही चित्रपट राष्ट्रीय चित्रपट निर्मिती महामंडळ अर्थात एनएफडीसीच्या अर्थसहाय्याने निर्माण झाले. वेगळ्या प्रवाहातील चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी हे होते), चित्रपटगृह प्राप्त होणे आणि अशा समांतर चित्रपटासाठी प्रेक्षक संस्कृती वाढवणे, त्यानुसार काही चर्चासत्र आयोजित करणे अशी एक प्रकारची चळवळ निर्माण केली गेली.




पन्नास वर्षांत भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासह जगभरातील कान्स, बर्लिन, मॉस्को, मेलबर्न अशा अनेक देशातील चित्रपट महोत्सवात श्याम बेनेगल दिग्दर्शित चित्रपटांचा समावेश होत आहेच. त्यात त्यांच्या चित्रपटांच्या पोस्टर्सनी जगभरातील चित्रपट दिग्दर्शक, कलाकार, अभ्यासक, विश्लेषक, पत्रकार यांचे लक्ष वेधून घेतले.

अगदी फिल्म मार्केटमध्ये या पोस्टरचे स्थान व महत्त्व उल्लेखनीय ठरले. आताही त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांच्या विशेष महोत्सवाचे आयोजन करण्यात येईल तेव्हा त्यांच्या या चित्रपटांच्या बोलक्या व प्रभावी अशा पोस्टर संस्कृतीवर विशेष फोकस (एखादा परिसंवाद) एक वेगळेपण ठरेल. त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांचे पोस्टर प्रदर्शनदेखील लक्षवेधक ठरेल, आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोर वेगळा आदर्श राहिल, बरेच काही शिकता येईल आणि त्यांना एक वेगळीच श्रद्धांजलीही ठरेल. पोस्टर डिझाईन हीदेखील त्यांची विशेष खासियत होती हे या सगळ्यातून एस्टॅब्लिज होईल.

---

# मराठी गायकनट मास्टर दिनानाथ मंगेशकर



प्रख्यात मराठी गायकनट. संगीत रंगभूमीच्या सुवर्णयुगाचा एक प्रतिभावंत शिल्पकार, एका अनुपम मोहक अशा रससशीत गानशैलीचा कल्पक उद्गाता, प्रथम श्रेणीच्या मौजक्या गायकनटांपैकी एक अतुलनीय तेजस्वी व मनस्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे मास्टर दीनानाथ मंगेशकर. त्यांचा जन्म २९ डिसेंबर १९०० रोजी गोव्यातील मंगेशी येथे व तेथीलच निसर्गसम्य परिसरात बालपण गेले.

श्री मंगेश देवस्थान येथील उपाध्ये-पुजारी गणेशपंत नवाथे (अभिषेकी) हे त्यांचे वडील व येसूबाई (पूर्वाश्रमीच्या राणे) मातोश्री होत. त्यांना उपजतच उंच, खणखणीत, सुरेल व भिंगरीसारखी फिरत असलेला असामान्य आवाज व अस्खलित वाणी लाभली होती. बालपणीच त्यांचा नावलौकिक 'किर्लोस्कर नाटक मंडळी'सारख्या श्रेष्ठ नाट्यसंस्थेच्या चालकांच्या कानावर गेला आणि केवळ चौदा वर्षांच्या दीनानाथांना बालगंधर्वांसारख्या अलौकिक गायकनटाची जागा भरून काढण्यासाठी पाचारण करण्यात आले. किर्लोस्कर मंडळीच्या ताजे वफा, काँटोंमें फूल इ. हिंदी-उर्दू नाटकांतील दीनानाथांच्या संगीत भूमिका विलक्षण लोकप्रिय ठरल्या. आपल्या विशाल, पाणीदार नेत्रांच्या, देखण्या व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने व निर्भर अशा मुक्त गायनाने त्यांनी रंगभूमी गाजवून सोडली. अच्युतराव कोल्हटकरांनी दीनानाथांना 'मास्टर' हे उपपद लावले.

मास्टर दीनानाथ हे 'बलवंत संगीत मंडळी'चे (स्थापना १९१८) प्रमुख मालक-भागीदार होते. या नाटक मंडळीने मनोरंजनाबरोबरच बोध, देशभक्ती, समाजसुधारणा यांचे दर्शन घडवणारी राम गणेश गडकरी, वीर वामनराव जोशी, स्वातंत्र्यवीर सावरकर, वासुदेव शास्त्री खरे, विश्राम बेडेकर इ. अग्रगण्य नाटककारांची नवनवीन नाटके रंगूभूमीवर आणली. तसेच जुनी गाजलेली नाटकेदेखील बलवंतच्या रंगभूमीवर होत असत. 'गंधर्व' आणि 'ललितकलादर्श' अशा प्रस्थापित नाटक मंडळ्यांबरोबर बलवंतने स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले.

दीनानाथांच्या गाण्यांतून व अभिनयातून वीर, शृंगार, शांत हे रस प्रामुख्याने प्रत्ययास येते. मृदुलमधुर गानवृत्तीचे बालगंधर्व व प्रखर आक्रमक गानपद्धतीचे केशवराव भोसले हे चंद्र-सूर्य तळपत असतानाच तेजस्वी शुक्रासारखे दीनानाथ रंगभूमीवर आले. यांपैकी कुणाचेही अनुकरण न करता, स्वतःचे स्वतंत्र आणि चमत्कृतीपूर्ण, पण अत्यंत भावमधुर व काळजाला भिडणारे गाणे गाऊन गेले, यातच दीनानाथांचे महत्त्व व मोठेपण सामावले आहे. मराठी नाट्यसंगीतावर बालगंधर्वप्रमाणेच दीनानाथांच्या गानपद्धतीचा ठसादेखील स्पष्टपणे उमटलेला आढळतो.

नाट्यगीतांप्रमाणे शास्त्रोक्त संगीतही दीनानाथ उत्तम प्रकारे, स्वतःच्या स्वतंत्र व कल्पक वळणाने गात असत. त्यांनी नाट्यसंगीतात पंजाबी ढंग प्रथम आणला असे मानले जाते. त्यांनी मैफली गाजवल्या, संगीत समारोहांत स्वतःचे स्थान सिद्ध केले. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून निराळे. सुंदर गाणे रसिकांना ऐकवले. गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे यांचे ते गंडाबंद शागीर्द होत तथापि इतर अनेकांची गायकी आत्मसात करून त्यांनी स्वतःची स्वतंत्र शैली घडवली.

१९३४मध्ये 'बलवंत पिक्चर कॉर्पोरेशन' काढून त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. कृष्णार्जुन युद्ध हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यात त्यांनी अर्जुनाची भूमिका केली. त्यांची 'सुहास्य तुझे मनासि मोही' यासारखी या चित्रपटातील गाणी अतिशय लोकप्रिय झाली. दीनानाथांचे कावीळ, जलोदराच्या विकाराने २४ एप्रिल १९४२ रोजी पुण्यात अकाली निधन झाले.

**-प्रभाकार जठार**

---

# 'रामायण'ची निर्मिती करणारे रामानंद सागर

हिंदू धर्मात 'रामायणा'चे महत्त्व खूप मोठे आहे. प्रत्येक माणसाचा रामायणाशी अगदी जवळचा संबंध आहे. पुराणातील 'रामायण' पहिल्यांदा पडद्यावर दाखवण्याचा काम रामानंद सागर यांनी केलं होतं. आज (२९ डिसेंबर) रामानंद सागर यांची जयंती आहे. 'रामायण' ही मालिका रामानंद सागर यांनी दिग्दर्शित केली होती. या मालिकेमुळे त्यांना घराघरात ओळख मिळाली. पण, रामानंद सागर यांच्यासाठी हा प्रवास अजिबात सोपा नव्हता. या दरम्यान त्यांच्या आयुष्यात अनेक चढउतार आले.



अनेक वर्षांपूर्वी टीव्हीवर 'रामायण' ही मालिका लागायची. आजही या मालिकेची लोकप्रियता तशीच आहे. या मालिकेने प्रेक्षकांच्या हृदयात विशेष स्थान निर्माण केले होते. सर्वांना ही 'रामायण' मालिका खूप आवडायची. 'रामायण' मालिकेची क्रेझ इतकी होती की, 'रामायण' सुरू झाल्यावर रस्त्यांवर शुकशुकाट असायचा. या 'रामायण' मालिकेचे दिग्दर्शन रामानंद यांनी केले होते. रामानंद सागर त्यावेळी प्रचंड लोकप्रिय झाले होते. मात्र, त्यानंतर त्यांचं नावच इंडस्ट्रीमधून गायब झालं.

रामानंद सागर यांचा जन्म २९ डिसेंबर १९१७ला लाहोरमध्ये झाला होता. जन्मा वेळी त्यांचे नाव 'चंद्रमौली' ठेवण्यात आले होते. त्यांचे आजोबा पेशावरहून येऊन आपल्या कुटुंबासोबत काश्मीरमध्ये स्थायिक झाले. रामानंद सागर अवघ्या ५ वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. रामानंद यांना लहानपणापासूनच वाचनाची आणि लेखनाची आवड होती. वयाच्या १६व्या वर्षी त्यांनी त्यांचे पहिले पुस्तक लिहिले. या पुस्तकाचे नाव होते 'प्रीतम प्रतीक्षा'. त्या काळात रामानंद आपल्या अभ्यासाचा खर्च भागवण्यासाठी छोटी-मोठी नोकरी करत असत. शिपायापासून ते साबण विकण्यापर्यंतचे काम त्यांनी केले आहे. अशा छोट्या-छोट्या नोकऱ्या करून त्यांनी आपले छंद पूर्ण केले आणि अभ्यासही पूर्ण केला.

रामानंद सागर यांना लेखनाची इतकी आवड होती की, त्यांनी ३२ लघुकथा, चार कथा, एक कादंबरी आणि दोन नाटके लिहिली. पंजाबमधील दैनिक मिलापचे ते संपादकदेखील होते. त्यांनी चित्रपटांमध्ये क्लॅपरबॉय म्हणून काम करायला सुरुवात केली. नंतर रामानंद सागर यांनी पृथ्वी थिएटर्समध्ये सहाय्यक स्टेज मॅनेजर म्हणून काम करायला सुरुवात केली. यानंतर हळूहळू त्यांनी बॉलिवूडमध्ये आपले नाव कमावले. (साभार : इंटरनेट)

---


# बॉलीवूडमधील पहिले सुपरस्टार राजेश खन्ना

भारतीय चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार हा किताब मिळविणारे अभिनेते म्हणजे राजेश खन्ना. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव होते जतिन खन्ना. जतिन उर्फ राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला.

त्यांच्या वडिलांचे नाव होते लाला हिरानंद आणि आईचे नाव होते चंद्रानी खन्ना. त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी त्यांना दत्तक घेतले. त्यांची नावे आहेत चुन्नीलाल खन्ना आणि लीलावती खन्ना. त्यांचे नवीन आई-वडील हे रेल्वे कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करत होते. ते सन १९३५ मध्ये लाहोर हुन मुंबईला आले. सुरुवातीच्या काळात राजेश खन्ना सरस्वती निवास मध्ये राहत होते जे मुंबईच्या गिरगाव भागात आहे. राजेश खन्ना यांनी आपले शालेय शिक्षण सेंट सेबॅस्टियन गॉन हायस्कूल येथून पूर्ण केले.

१९६२ रोजी राजेश खन्ना यांनी एका नाटकात जखमी सैनिकाची भूमिका निभावली. त्यानंतर त्यांनी पुण्याच्या नवरोसजी वाडिया महाविद्यालयात पदवीसाठी प्रवेश मिळविला. तेथे दोन वर्ष शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी मुंबईच्या के. सी. कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या काकांनी त्यांचे नाव राजेश असे ठेवले. त्याकाळी राजेश खन्ना हे एक टॅलेंट हंटचा भाग होते, ज्याच्यामध्ये राजेश खन्ना यांनी प्रथम स्थान मिळवले आणि त्यामुळे त्यांना बी. आर. चोप्रा, बिमल रॉय, नासिर हुसेन, जे ओम प्रकाश, मोहन सहगल यांच्यासारख्या कसलेल्या दिग्दर्शकासमोर काम करण्याची संधी मिळाली.

राजेश खन्ना यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीची सुरवात आखरी खत या चित्रपटाद्वारे १९६६ साली केली, ज्याचे दिग्दर्शन चेतन आनंद यांनी केले होते. त्यानंतर त्यांना राज या चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. त्यांचा आखरी खत हा चित्रपट भारतातर्फे बेस्ट फॉरेन लँग्वेज चित्रपटाच्या ऑस्करसाठी पाठविण्यात आला होता.



दिग्दर्शक शक्ती सामंत यांनी त्यांना एक भूमिका देऊ केली जी ऐकल्यानंतर राजेश खन्ना यांनी तत्काळ नकार दिला आणि सांगितले की या चित्रपटात मुख्य भूमिका ही नायिकेची आहे. यामध्ये मला फारसा वाव नाही. शक्ती सामंत यांनी समजूत काढल्यानंतर राजेश खन्ना या चित्रपटांसाठी तयार झाले. या चित्रपटात त्यांनी असा अभिनय केला की भारतीय हिंदी चित्रपटसृष्टीला पहिला सुपरस्टार मिळाला. या चित्रपटाचं नाव होते आराधना. राजेश खन्ना आणि शर्मिला टागोर यांची जोडी त्याकाळी खूपच गाजली. त्यांनी चाहत्यांचं ते प्रेम अनुभवलं जे आजपर्यंत कुठल्याही सुपरस्टारने अनुभवलं नसेल. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. जिथं त्यांची गाडी जायची, मुली ती धूळ आपल्या भांगात भरायच्या. बराचशा मुलींनी राजेश खन्ना यांच्या फोटोबरोबर लग्न केले होते.

राजेश खन्ना यांनी एकाच वेळी एकापाठोपाठ एक १५ सुपरहिट चित्रपट देऊन एक वेगळाच विक्रम प्रस्थापित केला जो आजही अबाधित आहे. राजेश खन्ना एक असे सुपरस्टार बनले होते की मोठ्यात मोठा संगीत दिग्दर्शक त्यांच्या चित्रपटांमध्ये संगीत देत होता. राजेश खन्ना १९७० ते १९८७ या दशकातील सर्वात जास्त मानधन घेणारे कलाकार होते त्यानंतर त्यांचा हा वारसा अमिताभ बच्चन यांनी १९८० ते १९८७ या दशकात चालविला. त्यांनी मार्च १९७३मध्ये डिंपल कपाडिया यांच्याबरोबर लग्न केले. त्यावेळी डिंपल कपाडिया या बॉबी चित्रपटांमधून आपल्या चित्रपट कारकीर्दीची सुरुवात करीत होत्या. राजेश खन्ना आणि डिंपल यांना दोन मुली आहेत. एक नाव ट्विंकल खन्ना आणि दुसरीचे नाव रिंकी.

राजेश खन्ना यांना आतापर्यंत तीन वेळा बेस्ट ॲक्टर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. भारतीय टपाल खात्याने ३ मे २०१३ रोजी त्यांच्या स्मरणार्थ एक पोस्टाचे तिकीटसुद्धा काढले. मुंबईच्या गिरगाव भागात एका चौकाचे नावदेखील सुपरस्टार राजेश खन्ना चौक असे ठेवले गेले आहे. त्यांच्या जीवनावर आधारित राजेश खन्ना द अनटोल्ड स्टोरी ऑफ इंडियास फर्स्ट सुपरस्टार हे पुस्तक २०१४ रोजी प्रदर्शित झाले. २०१२मध्ये तो दिवस आला जेव्हा त्यांचा आजारपण वाढत गेले. १८ जुलै २०१२ रोजी त्यांनी आपल्या आशीर्वाद बंगल्यात अखेरचा श्वास घेतला.

**(साभार : मराठी विकीपीडिया)**

# प्रदूषणमुक्त माथेरानला पर्यटकांची पसंती

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

पर्यटकांचे आवडते प्रदूषणमुक्त तसेच वाहनमुक्त पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये नाताळ हंगामासाठी आणि नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळत आहे. माथेरान बाजारपेठ व पॉईंट परिसरात सर्वत्र पर्यटकांची तोबा गर्दी दिसत आहे.



मुंबई-पुण्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर असल्याने लाखो पर्यटक माथेरान पर्यटनस्थळी भेट देतात. यंदाच्या नाताळ हंगामासाठी आणि नववर्षाच्या स्वागतासाठी हजारोंच्या संख्येने पर्यटक माथेरानमध्ये दाखल झाले आहेत. माथेरान नगरपालिकेकडून पर्यटकांसाठी मुख्य प्रवेशद्वाराजवळ विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

येथील वाहनतळ या ठिकाणी नेहमीच पार्किंग व्यवस्था गंभीर असायची, पण या वेळी वनविभागामार्फत नियोजनबद्ध काम केल्याने येणाऱ्या वाहनचालक पर्यटकांना कोणतीही समस्या उद्‌भवणार नसल्याचे सांगण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे आबालवृद्धांच्या आणि सर्वांच्याच आवडीची माथेरानची राणी अर्थात मिनिट्रेन सेवा सुरळीत सुरू आहे. मिनिट्रेनच्या फेऱ्या भरभरून येत आहेत.

या ठिकाणी नव्याने सुरू झालेली पर्यावरणपूरक ई-रिक्षासेवासुद्धा नियमित सुरू असून वयोवृद्ध पर्यटक, ज्येष्ठ महिला पर्यटक व येणारे दिव्यांग पर्यटक यांना याचा माफक दरात लाभ मिळत आहे. पुढील चार दिवस आता माथेरानमध्ये पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

या वेळेला माथेरानच्या डोंगरमाथ्यावर जोरदार पाऊस पडल्यामुळे वातावरण अगदी आल्हाददायक झाले आहे. डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून माथेरानमध्ये गुलाबी थंडी जाणवू लागली. हळूहळू तापमनात वाढ होऊन शुक्रवारपर्यंत १४ डिग्री अंशापर्यंत पोहचले होते. त्यामुळे माथेरान शहरात दाखल झालेले नवविवाहित कपल्स आणि तरुणाईदेखील या गुलाबी थंडीचा आनंद घेत फिरताना दिसत आहेत.

**नाताळ सुट्टी आणि त्यात वीकेण्ड असल्याने मुंबईपासून माथेरान जवळ असल्याने दोन दिवसांची ट्रिप म्हणून परिवारासोबत आलो. इथल्या आल्हाददायक वातावरणामुळे आम्ही भारावून गेलो. प्रदूषणमुक्त वातावरणात फिरताना शहरी भागाचा विसर पडला. एका वेगळ्या दुनियेत आल्यासारखा भास होत आहे.**

**-अथर्व गणेश, पर्यटक, मुंबई**

**यंदाचा नाताळ हंगाम जोरदार असून पर्यटक मोठ्या संख्येने माथेरानमध्ये आले आहेत. आम्ही दुकाने सजवून पर्यटकांच्या सेवेसाठी तयार झालो आहोत. पर्यटकदेखील येथे येत खरेदी करीत आहेत.**

**-सलीम शेख, व्यावसायिक**

# स्वदेस फाऊंडेशनतर्फे पोलादपूरचे कलमवाडी झाले 'स्वप्नातील गाव'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील वझरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत कलमवाडी हे गांव स्वदेस फाऊंडेशनतर्फे स्वप्नातील गांव जाहिर करण्यात आले. यासंदर्भात अधिकृत घोषणा गुरूवारी स्वदेसचे संचालक राहुल कटारिया तसेच महाड व पोलादपूर वरिष्ठ व्यवस्थापक मेघना फडके, पोलादपूरचे व्यवस्थापक दिपेश जाधव, वरिष्ठ समन्वयक सुजल अहिरे यांच्यासह तहसिलदार कपिल घोरपडे, सरपंच संभाजी जाधव, गाव विकास समिती अध्यक्ष दशरथ उतेकर, उपाध्यक्षा शीतल जाधव, सचिव वैभव घोलप, संतोष घोलप, शिवाजी जाधव, राजाराम जाधव, शारदा सुतार, सविता सुतार, चंद्रकांत जाधव आणि तुर्भे बुद्रुकच्या सरपंच सुरेखा गोळे, केशव खेडेकर, वासंती पवार, संजना शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.



या वेळी प्रास्ताविकामध्ये मनिष शिंदे यांनी कलमवाडी गाव स्वच्छ, सुंदर, स्वास्थ्य, सक्षम, साक्षर या पाच सुत्रांवर काम सुरू करून स्वप्नातील गांव होण्यासाठी येणारे अडथळे व त्यावर कशी मात केली याबाबत इत्यंभूत माहिती देताना मागील तीन वर्षांपासून शासन आणि स्वदेस समन्वयामधून १ कोटी १७ लाख चार हजारांचा निधी खर्च झाल्याचे सांगितले. तहसिलदार कपिल घोरपडे यांच्या हस्ते गाव विकास समितीचे अध्यक्ष दशरथ उतेकर यांचा सत्कार करण्यात आला.

पोलादपूरचे व्यवस्थापक दिपेश जाधव यांनी, गाव विकास समितीचे अध्यक्ष दशरथ उतेकर यांच्या प्रयत्नांतून क्राऊड फंडींग जमा करण्यात येऊन या निधीच्या माध्यमातून अनेक कामे करण्यात आल्याची माहिती देताना कलमवाडी यापुढे १०० टक्के स्वप्नातील गांव घोषित होण्यासाठी करायच्या प्रयत्नांबाबत विवेचन केले.

# आरे बुद्रुक ग्रामपंचायतीकडून डस्टबिनचे वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

शासनाच्या १५व्या वित्त आयोगातुन ४०० घरगुती कचराकुंडीचे (डस्टबिन) वाटप रोहा तालुक्यातील आरे बुद्रुक ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या आरे बुद्रुक, आरेखुर्द आणि कुंभोशी या गावांमध्ये करण्यात आले.

गावांमध्ये, घरांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी निर्माण होणारा कचरा टाकण्यासाठी डस्टबिनचा वापर व्हावा, कारण डस्टबिनमुळे दुषित आणि कुजलेला कचरा एकाच ठिकाणी साठवता येतो आणि तो आसपासच्या वातावरणापासून दूर नेता येतो, तर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डस्टबिनचा खूप फायदा होतो. या अनुषंगाने डस्टबिनचे वाटप आरे बुद्रुक ग्रामपंचायतीकडून करण्यात आला.



या कार्यक्रमास सरपंच राजेंद्र मळेकर, ग्रामसेविका प्रिया कुंडे, सदस्य अनिता चोंडे, चेतन शिंदे, प्रशांत शिंदे, सुहास शिंदे, दगडू शिंदे, संकेत घाग, नरेश चोंदे, पुंडलिक घाग, परशुराम म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# 'कळसूबाई' सर करणाऱ्या सुज्ञेशचा गौरव

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी सुज्ञेश सुनील फुणगे याने वयाच्या सातव्या वर्षी महाराष्ट्रातील १६४६ मीटर उंची असणारे कळसुबाई हे सर्वाधिक उंच शिखर सर करुन आपल्या आई-वडिलांसोबत पेण एज्युकशेन सोसायटीचे नाव मोठे केले असून सर्व स्तरातून त्याचे कौतुक केले जात आहे. पेण एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मीडियम स्कूलचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नुकताच झाला. यात त्याचा गौरव झाला.



या कार्यक्रमाला संस्थेचे माजी अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने, शुभांगी नेने आणि संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांच्यासह उपाध्यक्ष तथा खजिनदार संजय कडू, सचिव सुधीर जोशी, इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष प्रशांत ओक, घनश्याम देव, वसंत आठवले, दिगंबर चिंचणीकर, अमित देव, निता कदम, प्राचार्य रोहिणी म्हात्रे, शिक्षक प्रतिनिधी भारती महाडीक, विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार मोकल, माही वडके आदी उपस्थित होते.

कार्यक्रमप्रसंगी इयत्ता दुसरीमध्ये शिकणारा सुज्ञेश फुणगे या सात वर्षीय विद्यार्थ्यांने महाराष्ट्रातील १६४६ मीटर उंची असणारा कळसूबाई हा सर्वाधिक उंच शिखर चढून विक्रम केल्याबद्दल विशेष कौतुक करण्यात आले.

एखाद्या तरूणाला कळसूबाई शिखर चढायला साधारणतः चार ते पाच तास लागतात, परंतु सुज्ञेशने हे शिखर अवघ्या दोन तास २० मिनिटात चढुन विक्रम केल्याने त्याचे पालकांसमवेत विशेष कौतुक करण्यात आले. या वेळी शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, क्रीडा, कला यांसारख्या स्पर्धांमध्ये विशेष यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य रोहिणी म्हात्रे यांनी केले.



**माणगाव : राज्याच्या महिला व बालविकास खात्याच्या मंत्रिपदी पुन्हा निवड झाल्याबद्दल आदिती तटकरे यांचे माजी उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, नगरसेवक कपिल गायकवाड, सुनील पवार, माजी नगरसेवक सिराज परदेशी व सहकारी यांनी अभिनंदन केले.**

# पत्रकारांच्या कार्यालयासाठी खासदार तटकरेंना निवेदन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असणाऱ्या पत्रकारांकडून रायगड जिल्ह्यातील अलिबाग अथवा महत्वाच्या ठिकाणी पत्रकारांसाठी कार्यालय असावे यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तथा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्यावतीने रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे यांनी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे लेखी निवेदन देऊन मागणी केली. या वेळी जिल्ह्यातील पत्रकारांच्या हिताचा निर्णय घेवून मी सहकार्य करणार असल्याचे खासदार तटकरे यांनी बोलताना सांगितले.




दरम्यान, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने पत्रकारांच्या विविध समस्या आणि मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नागपूर दीक्षाभूमी ते मुंबई मंत्रालय अशी २६ दिवसांची संवाद यात्रा सर्व जिल्यातून काढली. या वेळी ठिकठिकाणी पत्रकारांनी संवाद यात्रेचे स्वागत करुन राज्यातील पत्रकारांच्या हितासाठी २४ मागण्या मांडल्या. यातील महायुती सरकारने पत्रकारांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापनेची मागणी मान्य केली. ज्यामुळे पत्रकारांच्या समस्या सुटण्याची वाट मोकळी झाली आहे. स्वतंत्र महामंडळाच्या स्थापनेमुळे पत्रकारांना आर्थिक सुरक्षा, विमा संरक्षण, विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळणार आहे. पत्रकार संघाच्या उर्वरित मागण्या तातडीने पुर्ण करण्याची विनंती सरकारकडे केली आहे. यातच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणिस डॉ. विश्वासराव आरोटे, रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून आभार मानत, पत्रकारांच्या उर्वरित मागण्या मान्य करण्याची विनंती केली आहे. यातच जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारांनी जिल्ह्यात महत्वाच्या जागी पत्रकारांसाठी कार्यालय असावे, अशी मागणी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे केली आहे

# इंदापूरचे 'यातायात' नाटक राज्य स्पर्धेत सादर

**माणगाव : बातमीदार**

६३व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत ठाणे या केंद्रावर डॉ काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात रंगमित्र सांस्कृतिक कला मंडळ इंदापूर यांनी आपल्या दमदार अभिनयाने 'यातायात' हे दोन अंकी नाटक सादर केल.

दर वर्षी रंगमित्र सांस्कृतिक कलामंडळ इंदापूर राज्यं नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवित असते ज्यात मोठ्या कलाकारांचे दोन अंकी नाटक, लहान मुलांसाठी बालनाट्य या कलेच्या माध्यमातून इंदापूर आणि इतर ग्रामीण भागातील कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न हे मंडळ सातत्याने करत आले आहे. या वर्षी ६३व्या राज्य नाट्य स्पर्धेत या मंडळाने सादर केलेलं यातायात हे नाटक प्रेक्षकाच्या पसंतीस आग्रणी ठरले लेखक अमोल कुलकर्णी, बुलढाणा यांनी हे नाटक लिहिले असून रंगमित्रचे प्रणय इंगळे यांनी दिग्दर्शित केले आहे.



नेहमीच्या आपल्या जगण्याच्या प्रवासात आपण एकमेकांशी आपली सुख दुःख वाटत राहिलो तर आपले जगणे खुप सुसह्य होत हेच ह्या नाटकात गूढ पण तितकेच रोमहर्षक प्रसंगातून दाखवले आहे.

बाजूच्या गावातून शहरांत ऑफिस ला अप-डाउन करणारे पाच कर्मचारी रेल्वेच्या प्रवासात एक गंभीर अडचण निर्माण होते. आशा प्रसंगात एकमेकांना आपली सुख दुःख वाटून ताण कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न आणि धडपड यांच्या वैविध्यपूर्ण घटनाक्रमाने नाटक प्रेक्षकांना श्वास रोखून धरायला भाग पडते सोबतच गमतीदार संवादाने प्रेक्षकांना खिळवून ठेवते यातूनपुढे पुढे त्यांची ह्या संकटातून सुटका होते की नाही या उत्कंठेतून प्रेक्षक नाटकात समरस होऊन जातात. या नाटकात प्रणय इंगळे, शिवम सागवेकर ,निर्भय भोपी, राकेश पवार, किरण केळूसकर ह्यांचा दर्जेदार अभिनय पाहायला मिळतो. प्रकाश योजना राजेश संसारे आणि प्रतिक भिंगारे यांची होती तर ट्रेन च नेपथ्य किरण केळूसकर आणि अशोक पवार यांनी उभ केल होत.

नाटकला साजेसं पार्श्वसंगीत काजल वाडेकर आणि प्रिती भोसले जाधव ह्यांनी दिल आहे तर रंगभूषा सिद्धिका गंभीर आणि वेशभूषा अश्विनी पवार यांनी केले आहे. देवेंद्र खातू, मिलिंद देशमुख, सागर खातू, साहिल देशमुख, प्रमोद मिरजकर, रोशन पवार ह्यांनी रंगमंच व्यवस्था सांभाळली.

यातायात या नाटकाचे दोन प्रयोग मराठा समाज सभागृह येथे इंदापूर मधील काही मान्यवर आणि रसिक प्रेक्षकांसमोर झाले तर स्पर्धे चा प्रयोग काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे येथे दिमाखात पार पडला.

## कोयनायन्स स्कूलमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**पेण : प्रतिनिधी**

येथील एन.व्ही.जी एज्युव्हेंचर फाउंडेशन संस्थेच्या कोनायन्सन स्कूलचे प्रवेश २०२५-२६साठी सुरू झाले असून नर्सरी ते अकरावीमध्ये प्रवेश मर्यादित आहेत. या संस्थेची शिक्षण व्यवस्था सीबीएससी बोर्ड आधारित आहे.

निसर्गाच्या सानिध्यात प्रशस्त इमारत, विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्व विकासाकडे बारकाईने लक्ष, मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. क्रीडा प्रकारामध्ये आउट डोअर आणि इनडोअर खेळांना प्राधान्य दिले जात आहे. बालदिन महोत्सवात विशेष गुणप्रदर्शनांना वाव दिली जाते. त्याचबरोबर हियाली महोत्सवातदेखील वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले जाते २६ जानेवारी प्रजासता दिनी विद्यार्थी लिखीत पुस्तकांचे दरवर्षी अनावरण केले जाते. ९७३०७९४४३६, ८६६८२७४९३० या भ्रमणध्वनीवर संपर्क करून प्रवेश निश्चित करा.

# पेणच्या ओम पप्पा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे गरीब, गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील ओम पप्पा चॅरिटेबल ट्रस्ट अंतोरा फाटा महाकाली मंदिर यांच्या वतीने सावरसई येथील चाईल्ड हेवन इंटरनॅशनल संचलित गरीब, गरजू मुलांसाठी असलेल्या शैक्षणिक वसतिगृहातील मुलांसाठी मदत म्हणून धनादेशाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास ट्रस्टचे उपाध्यक्ष हेमंत गुप्ता, सदस्य सुधाकर पोटे, सुविधा दीदी, प्रसाद पोटे, रीना गुप्ता, विर गुप्ता, सुलभा पोटे, रेखा पोटे, वैष्णवी गुप्ता, धारा गुप्ता, वसतिगृहाचे व्यवस्थापक प्रकाश पाटील, कविता पाटील, कार्यवाहक तेजस्विनी जाधव, चेतन राठोड, अविनाश राठोड आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना सदस्य सुधाकर पोटे यांनी सांगितले की, दरवर्षी प्रमाणे यंदाही ओम पप्पा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने गरीब, गरजू विद्यार्थ्यांना एक मदतीचा हात म्हणून मदत करीत असतो यासाठी येथील वसतिगृहाचे व्यवस्थापक याचे मोलाचे सहकार्य लाभते. आपल्या गुरुजनांचे मार्गदर्शनाखाली आपली प्रगती होवो अशा शुभेच्छा या वेळी सुधाकर पोटे यांनी दिल्या.

या वेळी प्रसाद पोटे यांनी आपले गुरुवर्य यांचे २४ डिसेंबर रोजी जयंतीनिमित्त व ९ फेब्रुवारी पुण्यतिथीनिमित्त याठिकाणी लहान मुलांसाठी मदत म्हणून हा उपक्रम येथे राबवित असल्याचे सांगितले. या वेळी ट्रस्टच्या वतीने १२ हजार रुपयांचा धनादेश उपाध्यक्ष हेमंत गुप्ता यांच्या हस्ते व्यस्थापक प्रकाश पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या वेळी लहानमुलांना अल्पोपाहार वाटप करण्यात आले. शेवटी झालेल्या नृत्य कार्यक्रमाने विद्यार्थ्यांनी उपस्थित पाहुण्यांचे मनोरंजन केले.






# नवी मुंबईमध्ये सायबर गुन्हे

## यंदा एक अब्ज ३७ कोटींहून अधिक रुपयांची फसवणूक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत जानेवारी ते नोव्हेंबर या केवळ ११ महिन्यात एक अब्ज ३७ कोटी ८० लाख ६२ हजार ३१७ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली आहे, तर ४० कोटी ४३ लाख ४४ हजार ४५६ एवढी रक्कम गोठविण्यात पोलिसांना यश आले. ११ महिन्यात ज्यांच्या विरोधात गुन्हे दाखल आहेत अशा ६२ जणांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे.

कमी गुंतवणुकीवर भरघोस नफा मिळवण्याचा मोह आणि सायबर गुन्ह्याबाबत अज्ञान या मुख्य कारणांनी ही फसवणूक झाली असून तक्रार उशिरा देणे आणि तपास अत्यंत किचकट असल्याने गुन्हेगारांचे फावते आहे.

सट्टा बाजारात गुंतवणूक करा अल्पवधीत भरघोस परतावा मिळावा, आम्ही पाठवलेल्या यु ट्यूब लिंकला लाईक सबस्क्राईब करा घरबसल्या रिवॉर्ड मिळवा, केवळ पॉईंट द्या आणि लाखो रुपये कमवा अशा फसव्या जाहिरातींना बळी पडलेल्या लोकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केली जात आहे. तसेच केंद्रीय अन्वेषण किंवा सीआयडी मधून बोलत असल्याची थाप मारत डिजिटल अटक, तुमच्या खात्यातून अतिरेक्यांना पैसे गेले



आहेत अशी धमकी देत पैसे घेतले जातात तसेच ऑनलाइन कॅमेरा चॅटिंगमध्ये अश्लील बोलून बीभत्स चाळे करण्यास भाग पाडणे आणि त्याची रेकॉर्डिंग करून पैशांची मागणी करणे असेही प्रकार घडले आहेत. या वर्षीची आकडेवारी चक्रावणारी असून ऑनलाइन फ्रॉडचे ३५२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात ३७ गुन्हे उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. जानेवारी ते नोव्हेंबर या केवळ ११ महिन्यात एक अब्ज ३७ कोटी ८० लाख ६२ हजार ३१७ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली आहे.

गुन्हा नोंद होताच ज्या बँकेत तक्रारदाराने रक्कम वर्ग केली आहे. त्या बँकेशी संपर्क साधून तत्काळ संबंधित खाते गोठवण्यात आल्याने ४० लाख ४३ हजार ४४ हजार ४५६ रुपये वाचले आहेत, मात्र ही रक्कम मिळवणे ही न्यायालयीन प्रक्रिया आहे. समाज माध्यमातून बदनामी करणे, अश्लील फोटो टाकणे अशा ४२ तक्रारी आल्या असून त्यात २५ गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले आहे.

बचावाचे पाच सोपे नियम सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांनी सांगितले की सायबर फसवणुकीपासून बचावाचे पाच अगदी सोपे नियम आहेत.

### हे लक्षात ठेवा!

- कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी सोशल मीडियाच्या माध्यमातून चॅटींग करू नये.
- अनोळखी व्यक्तीने सोशल मीडियाद्वारे सांगितलेले, गुंतवणूक योजना, पैसे वाढविण्याच्या स्कीम्स, विविध रिवार्ड पॉईंट्स कूपन्स अशा कोणत्याही आमिषाला बळी पडू नये.
- व्हॉटसप किंवा ई-मेलद्वारे आलेले डॉट ए.पी.के फाईल किंवा लिंकवर क्लिक करून डाउनलोड करू नये.
- कोणतेही अनोळखी ॲप मोबाईलमध्ये डाउनलोड करू नये.
- कोणाताही ओटीपी, पासवर्ड कोणालाच शेअर करू नये.
- नवी मुंबईत ११ महिन्यांत ऑनलाइन फसवणुकीचे ३५२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात ३७ गुन्हे उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# वाशी येथे अपघातात सहा वर्षीय मुलाचा मृत्यू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अपघाताच्या प्रसंगी प्रवाशाच्या सुरक्षेसाठी कारमध्ये एअरबॅग लावल्या जातात, मात्र नवी मुंबईच्या वाशी येथे कारमधील याच एअरबॅगमुळे एका सहा वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याचा प्रकार समोर आला आहे. शनिवारी झालेल्या या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या मुलाचे नाव हर्ष असून त्याचे वडील कार चालवत होते. त्यांच्या गाडीच्या समोर चालत असलेली एसयूव्ही डिव्हायडरला धडकली आणि हवेत उडून मागच्या कारच्या बॉनेटवर आदळली.

या प्रकरणी एसयूव्ही चालक डॉ. विनोद पचाडे (वय ४०) यांच्यावर बेजबाबदारपणे गाडी चालवून मृत्यूला कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित मुलगा हर्ष याच्या शरीरावर कुठलीही जखम नव्हती, मात्र डॉक्टरांनी अंदाज व्यक्त केला की पॉलीट्रॉमामुळे (शरीरावर एकापेक्षा जास्त जागी इजा होणे) धक्का बसून आणि रक्तस्त्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाला असेल. कारमध्ये हर्षबरोबर त्याचे तीन लहान भावंडे आणि वडीलदेखील प्रवास करत होते, ज्यांना किरकोळ जखमा झाल्या आहेत. तर डॉ. पचोडे यांनाही किरकोळ दुखापत झाली आहे.

दरम्यान, एअरबॅग सुरक्षेसाठी महत्त्वाच्या आहेत, परंतु काहीवेळा त्याच्यामुळे चेहरा आणि पोटाला दुखापत होऊ शकते. त्यामुळे १३ वर्षांखालील मुलांना पुढच्या सीटवर बसू देऊ नये, असा सल्ला दिला जातो.

# नवी मुंबईत अनधिकृत बांधकामांवर कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

उच्च न्यायालयाचे वेळोवेळी आदेशानुसार नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिसीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महापालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरूळ विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत उदय झिटे, एल. एल. १/बी-४६/४, से. १०, नेरूळ, नवी मुंबई, नामदेव मसल, एल. एल. १बी-४६/५, से. १०, नेरूळ, नवी मुंबई, विकास केसरवाणी, एल. एल. १बी-४२/१२, से. १०, नेरूळ, नवी मुंबई यांचे सदर ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता अंदाजे ३.७५ मी. द ७.७० मी मोजमापाचे जी+४ आरसीसी बांधकाम अनधिकृतरित्या करीत असल्याचे निर्दर्शनास आल्याने अनधिकृत बांधकामधारकाला नेरूळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५४ अन्वये १० डिसेंबर २०२४ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापी नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही.

कारवाई सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी जयंत जावडेकर व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, १० मजूर, १ गॅस कटर, ४ ब्रेकरच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

# अपहृत मुलाचा अवघ्या सहा तासांत शोध

## कामोठे पोलिसांची कामगिरी

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे भागातून अपहरण करुन अहमदनगर मधील नेवासा येथे नेण्यात आलेल्या सात वर्षीय मुलाचा कामोठे पोलिसांनी अवघ्या सहा तासामध्ये शोध घेतला आहे. या प्रकरणाच्या तपासानंतर अपहृत मुलाला त्याच्या वडिलानेच नेवासा येथे नेल्याचे उघडकीस आले आहे.

अपहृत मुलाचे आई-वडील मागील चार-पाच वर्षांपासून वेगवेगळे राहत असून सदर मुलगा आईकडे राहण्यासाठी गेल्यानंतर भंगार गोळा करत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर वडिलांनी मुलाला सोबत नेल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

या घटनेतील सात वर्षीय अपहृत मुलगा कामोठे भागात आईसह राहत असून, तो मोठा खांदा येथील मैदानात गेला असताना त्याचे अज्ञात व्यक्तींनी अपहरण करुन नेले होते. याबाबतची माहिती अपहृत मुलाच्या आईला समजल्यानंतर तिने तत्काळ कामोठे पोलीस ठाणे मध्ये धाव घेतली. कामोठे पोलिसांनी अज्ञात अपहरणकर्त्याविरुध्द तत्काळ गुन्हा दाखल करुन अपहरण झालेल्या मुलाचा शोध घेण्यासाठी कामोठे पोलीस ठाणेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक तयार करण्यात आले.

या पथकाने केलेल्या तपासात अपहृत मुलाला तीन तृतीयपंथीयांनी पांढर्या रंगाच्या स्कॉर्पिओ मधून कळंबोली दिशेने नेल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तसेच अपहृत मुलाच्या आईने देखील तिचे पती तृतीयपंथी असल्याची माहिती पोलिसांना देऊन त्यांच्यावर संशय व्यक्त केला. त्यामुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक तायडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रियांका खरटमल, पोलीस हवालदार झोळ, पोलीस नाईक सचिन ठोंबरे आदींच्या पथकाला तत्काळ अहिल्यानगर (अहमदनगर)मधील नेवासा येथे तर सहाय्यक पोलीस निरीक्षक यशवंत पाटील आणि त्यांच्या पथकाला पनवेलमध्ये रवाना करण्यात आले.

यानंतर कामोठे पोलिसांनी आहिल्यानगर (अहमदनगर) मधील श्रीरामपूर येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने तांत्रिक तपासाद्वारे अपहृत मुलगा, तीन तृतीयपंथीय आणि एक चालक यांना गाडीसह ताब्यात घेतले.या प्रकरणात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असला, तरी सदर मुलाला पित्यानेच सोबत नेल्याचे आढळुन आले आहे तसेच या मुलाच्या आई-वडिलांचा कायदेशीर घटस्फोट न झाल्यामुळे सध्या मुलाचा ताबा त्याच्या पित्याकडे देण्यात आल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रियंका खरटमल यांनी दिली.

अपहृत मुलगा घटनेतील तक्रारदार महिला कामोठे भागात राहत असून, तिचा पती जोगावा मागतो, तसेच तो तृतीय पंथीयासोबत राहत असल्यामुळे या दोघांमध्ये मागील पाच वर्षापासून दुरावा निर्माण झाल्याने त्यांचा मुलगा पित्यासोबतच राहत होता.

गत ऑक्टोबर महिन्यामध्ये मुलाची आई त्याला भेटण्यासाठी गेल्यानंतर तिने आपल्या सोबत मुलाला कामोठे येथे आणले होते. सकाळी या मुलाचा पिता कामोठे येथे भेटण्यासाठी आल्यानंतर त्याला आपला मुलगा भंगार वेचत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याला वाईट वाटल्याने त्याने मुलाला आपल्या सोबत नेल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले आहे.

# राज्यस्तरीय रफी गीत गायन स्पर्धेत करण म्हात्रे, अंबरीश म्हात्रे विजयी

**पनवेल : वर्ताहर**

ज्येष्ठ, लोकप्रिय पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या जन्मशताब्दी सांगता वर्षानिमित्त परवा देशभरातील रफीप्रेमींनी विविध कार्यक्रमांद्वारे रफीसाहेबांना आदरांजली अर्पण केली. या शताब्दीनिमित्त पनवेल-नव्या मुंबईत सांस्कृतिक क्षेत्रात गेली ३५ वर्षे उत्तम नावलौकिक मिळविलेल्या पनवेल कल्चरल सेंटरने द डिव्हाइन म्युझिक अनलिमिटेड यांच्या सहयोगाने पनवेलमध्ये भव्य, संस्मरणीय अशा राज्यस्तरीय रफी गीत गायन स्पर्धेचे आयोजन केले होते. करण म्हात्रे व अंबरीश म्हात्रे या स्पर्धेत विजयी ठरले.

१६ ते ४० आणि ४१ व त्यापुढील अशा दोन गटात झालेल्या या स्पर्धेत तब्बल १०० स्पर्धकांनी भाग घेतला होता. स्पर्धेच्या पहिल्या फेरीतून अंतिम फेरीसाठी २० स्पर्धकांची निवड करण्यात आली. स्पर्धेपूर्वी या वीस जणांना गायिका, लेखिका व चित्रपट संगीत अभ्यासक आणि या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून उपस्थित राहिलेल्या डॉ. मृदुला दाढे आणि संगीतकार, नोटेशन तज्ज्ञ व चित्रपट संगीत अभ्यासक अरविंद मुखेडकर यांचे गाणं कसं सादर करावं, दमश्वास, गाण्यातले भावदर्शन अशा अनेक विषयांत मौलिक मार्गदर्शन लाभले.

'याद न जाये..' या नावाने पनवेलमधील फडके नाट्यगृहात दि. २२ डिसेंबर २०२४ रोजी पार पडलेली या स्पर्धेची अंतिम फेरी हा रसिकांसाठी रफीसाहेबांच्या २३ सोलो गाण्यांचा रंगतदार कार्यक्रमच ठरला.

स्पर्धेत १६ ते ४० या वयोगटात करण म्हात्रे यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक संपादन केले तर पंढरीनाथ हुलावले यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. ४० पुढील वयोगटात अंबरीश म्हात्रे यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले, तर उदय कुडतरकर यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक संपादन केले. याशिवाय हरचरणजीत सिंग आणि विजय पंडित या साठीपार स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.


पनवेलमधील निष्णात सर्जन माजी रोटरी डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. गिरीश गुणे, डॉ. मृदुला दाढे, अरविंद मुखेडकर आणि पनवेल कल्चरल सेंटरचे अध्यक्ष मिलिंद गोखले यांच्या हस्ते ही पारितोषिके देण्यात आली.

या स्पर्धकांना व गायकांना उत्कृष्ट साथसंगत केली, महेंद्र गोखले, सुभाष मालेगांवकर, डॉ. अजित गोरे, अजय दामले अनिल खैरनार आणि विनायक कुलकर्णी यांनी. सुप्रसिद्ध निवेदक संदीप कोकीळ यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या उपक्रमास नील ग्रूप, पनवेल आणि पनवेल महापालिका यांचे व्हेन्यू पार्टनर म्हणून सहकार्य लाभले होते. जयंत टिळक आणि सतीश गुणे यांनी या उपक्रमाचे काटेकोर नियोजन केले तर मिलिंद गोखले, श्रीधर सप्रे, चंद्रकांत मने, अजय भाटवडेकर, डॉ. मनोज रणदिवे, मिलिंद देशमुख, राकेश पांडे, ज्योती गुणे, अश्विनी फडके यांचे त्यांना उत्तम सहकार्य लाभले.

# उरणच्या पाणजे पाणथळीवर परदेशी पाहुण्यांचे आगमन

**उरण : रामप्रहर वृत्त**

पाणजे येथील २८९ हेक्टर पाणथळीवर या वर्षीही परदेशी पक्षी असलेल्या फ्लेमिंगोचे आगमन सुरू झाले आहे. त्यामुळे या पाणथळीच्या संवर्धनासाठी न्यायालयीन आणि वैधानिक पातळीवर लढणाऱ्या पर्यावरणवाद्यांनी आनंद व्यक्त केला आहे. तर पक्षी निरीक्षकानी समाधान व्यक्त केले आहे.



उरणमधील सर्वात मोठया पाणथळीचे बहुतेक वेळा जलक्षेत्र कोरडे करण्यासाठी आंतरभरतीचे पाणी अडवले जात असल्याने पर्यावरणवादी संस्था नॅटकनेक्ट फाऊंडेशनने अनेकदा आक्षेप नोंदविले आहेत. तर पर्यावरणवाद्यांना दिलासा देण्यासाठी, राज्य सरकारने अलीकडेच चेन्नई येथील संशोधन संस्थेने सूचिबद्ध केलेल्या आणि दस्तऐवजीकरण केलेल्या ५६४ पाणथळ जमिनींपैकी एक म्हणून पाणजेची नोंद यादीत केली आहे. पाणजे येथील पाण्याचे इनलेट कधीही गुदमरणार नाहीत याची काळजी घेण्याची जबाबदारी आता सिडको, रायगड जिल्हाधिकाऱ्यांची आहे.

एवढ्या सुंदर, समृद्ध जैवविविधतेला गाडण्याचे हृदय कोणाचे असेल? या आणि इतर आंतरभरतीयुक्त आर्द्र प्रदेशांच्या देखभालीमुळे माशांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता सुनिश्चित होईल ज्यामुळे स्थानिक समुदायाला आधार मिळेल, असे मत सागर शक्तीचे नंदकुमार पवार यांनी व्यक्त केले आहे.

### न्यायालयीन लढाई

पर्यावरणाच्या दृष्टीने नाजूक उरणमधील पाणथळ जमीन आणि जैवविविधता वाचवण्यासाठी वनशक्ती आणि सागर शक्ती मुंबई उच्च न्यायालयात कायदेशीर लढा देत आहेत. पर्यावरणवाद्यांसाठी वादाचा मुद्दा हा आहे की वेटलँड NMSEZ (आता NMIIA) ला चुकीच्या पद्धतीने भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे ज्यामध्ये सिडको स्वतः २६ टक्के भागधारक असल्याचे मत नॅटकनेक्टचे संचालक बी.एन. कुमार यांनी व्यक्त केले आहे, तर फ्लेमिंगोचे आगमन हे नव्या हंगामातील सुखद अनुभव असल्याचे म्हटले आहे.

# चिरनेर कुंभारवाड्यातील पारंपरिक मातीच्या भांड्यांना वाढती मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील ग्रामीण भागात पूर्वीच्या काळी स्वयंपाक मातीच्या भांड्यात शिजवला जात असे, मात्र धातूच्या शोध लागल्यावर तांबे, पितळ लोखंड, स्टील, अल्युमिनियमची भांडी, स्वयंपाकासाठी वापरली जाऊ लागली. त्यानंतर हळूहळू मातीची भांडी स्वयंपाक घरातून लुप्त होऊ लागली, मात्र आता पुन्हा कालांतराने मातीच्या भांड्यांनी स्वयंपाक घरात आपले स्थान पक्क केले असून मातीच्या भांड्यात स्वयंपाक करण्याचा ट्रेंड पुन्हा आल्याने मातीच्या भांड्यांना पुन्हा एकदा भाव आला आहे.

कुंभारवाड्यातून मातीची भांडी खरेदी करण्याची संख्या वाढली आहे. विशेष म्हणजे उरण तालुक्यात उकडीच्या पिठाच्या तांदळाच्या भाकऱ्या करतात तर हल्ली पूर्वी सारखी भाकरी भाजण्यासाठी खापरीचा (मातीचा मोठा तवा) वापर मोठया प्रमाणात होत असून खापरीची मागणी वाढली आहे.

पूर्वी उरण परिसरात स्वयंपाक करण्यासाठी मातीची तई (भांड), खापरी (मातीचा तवा) भिन (पोळे व डोसे बनवण्याचा तवा, हंडी, मातीची चूल, यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जाई. मातीची भांडी हा स्वयंपाक घरातील अविभाज्य घटक होता कालांतराने या भांड्याची जागा विविध धातूंच्या भांड्यांनी घेतली. मात्र गेल्या काही दिवसात मातीच्या भांड्यात शिजवलेल्या अन्नाचा होणारा शरीरावर फायदा पहाता मोठ्या प्रमाणात मातीच्या भांड्यांना मागणी मिळत आहे. उरण तालुक्यात मोठया प्रमाणात पिठाची उकड काढून तांदळाच्या भाकऱ्या करतात, व या भाकऱ्या मोठया असतात. त्याच प्रमाणे लोखंडी तव्यावर या भाकऱ्या लगेच करपतात व पांढऱ्या शुभ्र भाकऱ्या होत नाहीत.

ॲल्युमिनियमच्या तव्यावरच्या भाकरीचे दुष्परिणाम पाहता,तसेच मातीच्या तव्यावर भाजलेल्या भाकऱ्या आरोग्यासाठी हानिकारक नाहीत, त्यामुळे दशकभरापूर्वी मागे पडलेल्या भाकरी भाजण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या खापऱ्या (मातीचा तवा) नागरिक पुन्हा वापरू लागले आहेत.त्यामुळे पुन्हा एकदा खापरीला महत्त्व प्राप्त झाले असून मोठ्या प्रमाणात नागरिक खरेदी करत आहेत.



याचबरोबर मातीच्या भांड्यात शिजवलेला स्वयंपाक खाण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. त्यामुळे मातीपासून बनवलेल्या भांड्याना मागणी वाढली आहे. उरण तालुक्यातील पंचक्रोशीतील चिरनेर गावात पारंपरिकरित्या मातीची भांडी बनवणारे व्यवसायिक मातीची भांडी बनवण्यात व्यस्त असल्याचे चित्र चिरनेर गावात पाहायला मिळत आहे. मातीची भांडी बनवण्यासाठी कुंभार समाजाची ३२ कुटुंब पिढ्यानपिढ्या त्यांचा व्यवसाय करीत आहेत.

आधुनिक युगात गॅसवर स्वयंपाक शिजवला जातो त्याची चव आणि चुलीवर व मातीच्या भांड्यात शिजवलेल्या पदार्थांची चव यात फरक आहे.मातीच्या भांड्यात जेवण अधिक पौष्टिक व स्वादिष्ट होते. त्याचप्रमाणे मातीच्या भांड्यात शिजवलेल्या अन्नामुळे गॅसची समस्या उत्पन्न होत नाही याशिवाय कमी तेलाचा वापर, आम्लपित्ताचा विकार टाळणे, कॅल्शियम, सल्फर, सिलिकॉन, कोलबाड, अशी विविध तत्वे मातीच्या भांड्यात अन्न शिजवल्यामुळे मिळत असल्याने नागरिकांचा मातीच्या भांड्यात अन्न शिजवण्याचा कल वाढला आहे. विशेष म्हणजे ही भांडी चिरनेरच्या कुंभारवाड्यात पन्नास रुपयांपासून ते तब्बल सहाशे ते सातशे रुपयांपर्यंत उपलब्ध होत आहेत. ही भांडी सात ते आठ वर्ष टिकत असून सध्याची तरुण पिढी मातीच्या भांड्यात अन्न बनविण्यास पसंती देत आहेत.

> पूर्वी सारख्या पारंपरिक खापऱ्या फक्त उरण परिसरात मिळतातं मातीची तई(भांड), भिन (पोळे व डोसे बनवण्याचा तवा), हंडी, मातीची चूल अशा पारंपरिक वस्तू घेण्यासाठी नागरिक मुंबई,ठाणे, नवी मुंबई पनवेल परिसरातून येतात.
>
> **-सुचित्रा मांडेलकर**, कुंभार

त्यामुळे नागरिकांच्या स्वयंपाक घरात पुन्हा मातीचा तवा, हंडी,कढई,कुकर, कुलहड अशा विविध वस्तू लाल व काळ्या रंगात पाहायला मिळत आहेत. त्याचप्रमाणे माठातील पाण्याचे फायदे पाहता माठ देखील स्वयंपाक घरात पाहायला मिळत आहेत.फ्रिजमधील पाण्यामुळे शरीरावर होणारा दुष्परिणाम पाहता वाढत्या उष्णतेत मडक्यामधील पाणी पित आहे. भाकरी भाजण्यासाठी लागणारी खापरी, मटन चिकन, व मासळीचा रस्सा बनवण्यासाठी लागणारी तई , भिन, पाण्यासाठी घागर अशा विविध मातीच्या भांड्याना पुन्हा एकदा मागणी मिळू लागली आहे. उरण परिसरातील चिरनेर मधील कुंभारवाड्यात मुंबई, नवी मुंबई, उरण, पनवेल तसेच उरण परिसरातील आसपासच्या गावातील नागरिक मातीच्या भांड्यांची खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत.

# आमदार विक्रांत पाटील यांनी केली गोशाळेची पाहणी



**पनवेल : वार्ताहर**

विधान परिषदेचे आमदार विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी पनवेल शहरात असलेल्या श्री पांजरापोळ गो-रक्षण संस्था (गौशाळा) येथे जाऊन त्या ठिकाणी सुरू असलेल्या नुतनीकरण प्रकल्पाद्वारे बांधण्यात येणाऱ्या गोशाळेची पाहणी केली.

या वेळी त्यांच्यासोबत माजी नगरसेवक राजू सोनी, व्यावसायिक नितीन मुनोत यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. या पांजरापोळ गोशाळेत जवळपास १००पेक्षा अधिक गोमाता आहेत. सेवाभावी वृत्तीने येथे गोमातेची काळजी घेतली जाते. बऱ्याच वेळेला येथे पशु आहार व चारा वाटपाचेदेखील कार्यक्रम होत असतात. या वेळी आमदार विक्रांत पाटील यांनी गोमातेचे पूजन करून संस्था चालकांकडून गोमाता संदर्भात पूर्ण माहिती घेतली तसेच या प्रकल्पासाठी आवश्यक ती पूर्ण मदत करू, असे आश्वासनसुद्धा दिले.

# पर्यटकांनी मुरुड हाऊसफुल्ल!

## जंजिरा किल्ला पाहण्यासाठी रांगा; अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडी



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील काशीद, मुरूड व ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांनी मोठी गर्दी केली आहे. राजपुरी येथे जंजिरा किल्ल्याचे तिकीट काढण्यासाठी पर्यटकांच्या रांगा लागत आहेत, तर राजपुरीकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने ट्राफिक जाम झाली.

सायंकाळी ४ वाजता समुद्राचे पाणी ओहोटी असल्याने कमी झाले व जेटीला लागत नसल्याने शेकडो पर्यटक किल्ला न पाहताच परतले. दुसऱ्या दिवशी ते सकाळी एकत्र आल्याने जेटीवर गर्दी झाली. शाळांच्या सहली दर दिवशी सुमारे १२ बसगाड्या येत असल्याने जंजिरा किल्ल्यात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यातच किल्ल्यात गेल्यावर जेटीवर काढलेले तिकीट चेक करताना प्रवेशद्वारावर मोठी गर्दी झाल्याने पर्यटक त्रस्त झाले.

समुद्र किनारी मोठ्या संख्येने पर्यटक अवतरले असून नाताळ सुट्टीचा आनंद घेत आहेत. पर्यटकांनी शनिवारी सायंकाळपासून गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. हळूहळू सर्व लॉज फुल झाले आहेत. समुद्र किनारी असणाऱ्या प्रत्येक स्टॉलवर गर्दी पहावयास मिळत आहे.



जंजिरा किल्ल्यावरसुद्धा मोठी गर्दी पहावयास मिळाली. औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर, लातूर, परभणी, मुंबई, कल्याण, डोंबिवली, विरार, दहिसर, ठाणे आदी भागातील पर्यटक मोठ्या संख्येने येथे हजर झाले आहेत. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांची मोठी गर्दी दिसत असून काही काळ वाहतूक कोंडीसुद्धा झाली, परंतु पोलीस आपली भूमिका चोख बजावत असल्याने वाहतुकीस रस्ता मिळत होत.

हॉटेलमधील चविष्ठ मासे खाण्यासाठी पर्यटकांनी मोठी गर्दी केल्याचेदेखील दिसून आले. पर्यटकांची संख्या वाढल्याने प्रत्येक घटकाला स्वयंरोजगार प्राप्त झाला आहे. पर्यटकांमुळे मुख्य बाजारपेठ फुली असून विविध वस्तू खरेदीसाठी पर्यटक जात आहेत,

समुद्रस्नान, बोटिंग, उंट सफारी, बनाना रायडिंग आदींचा आनंद लुटताना पर्यटक दिसत आहेत. मुरुड महिला मंचने पर्यटकांसाठी फूड आयोजन केलेय. तेथून कोकणी व सर्व प्रकारचे खाद्य पदार्थ चवीने पर्यटकांनी घेतले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पथके कार्यरत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क रायगड-अलिबाग विभागामार्फत जिल्ह्यात पाच कार्यकारी निरीक्षक पथके व दोन भरारी निरीक्षक पथके कार्यरत असून त्यांना रायगड जिल्ह्यातील मद्यविक्री आस्थापनामध्ये परराज्यातील मद्य तसेच बनावट मद्य विक्री होणार नाही याबाबत सर्व पथकांना सूचना देण्यात आल्या असल्याने त्यांच्याकडून परराज्यातील मद्यविक्री होणार नाही याबाबत योग्य खबरदारी घेण्यात आली असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक रविकिरण कोले यांनी दिली.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांना अवैध मद्य व हातभट्टी विकीवर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत तसेच महाराष्ट्रात परराज्यातून येणाऱ्या मद्यावर कारवाईकरिता प्रमुख रेल्वेस्थानकांमध्ये रेल्वे विभागाशी समन्वय साधून संशयित व्यक्तींच्या सामानाची तपासणी तसेच रात्रीच्या वेळी गस्त घालण्यात येऊन परराज्यातून येणाऱ्या संशयित वाहनांची तपासणी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### ...तर येथे करा संपर्क

***अवैध मद्य निर्मिती व विक्रीबाबत व्हॉटसअॅप क्र. ८४२२००११३३ व टोल फ्री क्र. १८००२३३९९९९वर संपर्क साधण्याबाबत जिल्ह्यात अनेक ठिकाणी फलक लावण्यात येऊन या क्रमांकावर येणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येत आहे.***

नववर्षानिमित्त जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटकांची संख्या वाढत असल्याने विविध कार्यक्रमाच्या ठिकाणी एकदिवसीय परवाना न घेता विनापरवाना मद्य वितरण होत असल्यास संबंधीतावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत तसेच जिल्हयातील रिसार्ट, हॉटेल, कॉटेज, फार्महाऊस या विभागाची तात्पुरती क्लब अनुज्ञप्ती प्राप्त करुनच कार्यक्रम आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

या विभागाची विधीग्राह्य अनुज्ञप्ती धारण न करता अवैधरित्या मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल व ढाब्यावर कठोर कारवाई करावी तसेच अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल, ढाब्याचे मालक व जागामालक यांचेवर प्रामुख्याने गुन्हा नोंद करण्यांबाबत सूचना या विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यामध्ये १ एप्रिल ते २६ डिसेंबर या कालावधीत एकूण एक हजार ७५५ गुन्हे नोंदविण्यात आले असून एकूण एक हजार ६४० आरोपींना अटक करण्यात आले आहे. या कारवायांमध्ये ७८ वाहने जप्त करण्यात आली असून एकूण ५,६०,५९,९८७ रुपये इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नागरिकांना करण्यात येते की, ज्या हॉटेल आस्थापनामध्ये तसेच बॅक्वेट हॉल, सोसायटी क्लब हाऊस, मैदाने या ठिकाणी जर नववर्षाच्या अनुषंगाने पार्टीचे आयोजन करणार असाल तर त्या ठिकाणी या विभागामार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या अनुज्ञप्तीची परवानगी घ्यावी. विनापरवानगी पार्टी केल्यास आयोजक/जागामालक यांच्यावर कारवाई करण्यात येईल तसेच ग्राहकांनी परवानाधारक अनुज्ञप्तीमधूनच मद्य खरेदी करण्याची दक्षता घेण्यात यावी. विशेष कार्यक्रमासाठी परवानगी शासनाच्या https//aaplesarkar.mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने वितरीत करण्यात येत आहे, असे कळविले आहे.

# गटशिक्षणाधिकारी सुनील गवळींचा गौरव

**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदाल विद्यालय साळाव येथील पारितोषिक वितरण कार्यक्रमात अलिबाग मुरूड विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांनी पंचायत समिती मुरूडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांना मानपत्र देवून गौरविण्यात आले. या वेळी तालुक्यातील सर्व शिक्षकांनी आनंदोत्सव व्यक्त केला. २०१६ साली सुनील गवळी यांनी मोबाईल डिजिटल मुरूड ही अभिनव संकल्पना राबविल्याबद्दल महाराष्ट्राचे तत्कालीन शिक्षण सचिव नंदकुमार यांनी शाबासकी दिली होती.

उत्तम प्रशासनाचा गाडा हाकून शिक्षकांना शिस्तीची व कर्तव्यतत्परतेची प्रेरणा दिली. मुख्यमंत्री सुंदर शाळा, परसबाग स्पर्धा, व्हिडीओ निर्मिती स्पर्धा, नवभारत साक्षरता उपक्रम, शिष्यवृत्ती परीक्षेतील लक्षणीय कामगिरी, स्पर्धा परीक्षेत विद्यार्थी करीत



असलेली कामगिरी त्याबरोबरीने निपुण भारत कार्यक्रमात तालुक्याने साधलेली प्रगती हे सुनील गवळी यांच्या कार्याची पोहपावती असल्याच्या प्रतिक्रिया तालुक्यातील सर्व शिक्षक व्यक्त करीत आहेत.

तालुक्यातील पदाधिकारी अधिकारी यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करून त्यांनी शिक्षकांना वस्तुपाठ घालून दिला आहे. प्रत्येक शिक्षकांशी मैत्रीपूर्ण वर्तनातून प्रशासनावर पकड मजबूत केली आहे. मुरूड मधील प्रत्येक शाळेत ई लर्निंग सुरू करून अध्ययन अध्यापन प्रक्रियेत बारीक लक्ष घालून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत कसलीच तडजोड न करण्याची शिकवण शिक्षकवृंदाना दिली आहे.

अशा प्रकारच्या कार्याची दखल घेवून सुनिल गवळी गटशिक्षणाधिकारी यांचे मानपत्र देवून आमदार महेंद्र दळवी यांनी गौरव केला. या वेळी तालुक्याचे गटविकास अधिकारी खताळ प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर विस्तार अधिकारी नरेंद्र गुरव यांच्यासह सर्व केंद्रप्रमुख, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ई-लर्निंगयुक्त मुरूड तालुका ही संकल्पना राबवून गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्तेत योगदान दिले. त्याचबरोबर विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी ते कार्यतत्पर असतात.**

**-पुनिता गुरव,**
**शिक्षणाधिकारी, रायगड**

**गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी हे आम्हा शिक्षकांना सातत्याने प्रेरणा देत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी विविध उपक्रम राबवितात. प्रत्येक शिक्षकाचे प्रश्नांचे ते निरसन करतात तसेच नवनवीन शैक्षणिक प्रयोग करण्याची दिशा देतात.**

**-हेमकांत गोयजी,**
**मुख्याध्यापक,रा.जि.प. शाळा, मजगाव**

## मृतदेहाची ओळख पटवण्याचे आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाण्याच्या अखत्यारीतील दूर क्षेत्र चौक पोलीस यांच्या हद्दीतील मौजे वडविहिर बौद्धवाडा गावच्या हद्दीत चौक कर्जत रस्त्यावरील बस थांबा लगत एक बेवारस पुरुष मृतदेह आढळला आहे.

अंदाजे ५० ते ६० वर्षाचे वय असून मध्यम बांधा, निम गोरा रंग, डोक्यावर वाढलेले काळे पांढरे केस, वाढून पिकलेली दाढी मिशी, अंगात सफेद टी शर्ट आणि निळ्या रंगाची पँट असा पेहराव आहे. ६४/२०२४ बि.एन. एन.एस./२०२३ कलम १९४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या मृत व्यक्तींबाबत काही माहिती मिळाल्यास पोलीस उप निरीक्षक एम.डी.बहाडकर (९६५७०७२१६४) अथवा खालापूर पोलीस ठाणे ०२१९२२७५०३३ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# धैर्य संस्थेमार्फत विद्यार्थिनींना मेन्स्ट्रूअल कप वितरण उपक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील धैर्य सामाजिक संस्थेच्या माध्यमातून रायगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नरवीर तानाजी मालुसरे माध्यमिक शाळा, देवळे येथील कुमारिका विद्यार्थिनी, शिक्षिका आणि शिक्षकेतर महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीच्या कपचे म्हणजेच मेन्स्ट्रूअल कपचे वाटप करण्यात आले.

महिला आरोग्य विषयक कार्यक्रमासाठी धैर्य सामाजिक संस्थेच्या सदस्या तृप्ती ओंकार उतेकर, सहशिक्षिका गीता अनंत गोळे, मुख्याध्यापक पिंगळा उपस्थित होते. मासिक पाळीमध्ये मेन्स्ट्रूअल कप का वापरावा, कसा वापरावा, त्याचे फायदे याबाबत इत्यंभूत माहिती संस्थेच्या सदस्या तृप्ती उतेकर यांनी विद्यार्थिनींना दिली.

विद्यार्थिनींना मासिक पाळीतील स्वच्छतेसाठी मासिक कप वितरण कार्यक्रमासाठी कोप्रान फार्मा कंपनीने सहकार्य केले. या कार्यक्रमाचे आयोजन स्वराज सेवा वाघमोडे प्रतिष्ठान यांनी केल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या आणि शाळेच्यावतीने मुख्याध्यापक पिंगळा यांनी यांचे मन:पूर्वक आभार मानले.

धैर्य सामाजिक संस्थेच्या प्रयत्नातून युवतींच्या आरोग्य, स्वच्छता आणि आत्मविश्वासासाठी टाकलेले हे महत्त्वाचे उपक्रम स्वरूपातील पाऊल असल्याचे सहशिक्षिका गीता गोळे यांनी सांगितले.



# खोपोलीत बलिदान सप्ताहानिमित्त विशेष कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

शिखांचे दहावे गुरु, गुरू गोविंद सिंह यांचे चार चिरंजीव साहेब जादे अजित सिंह, जुझार सिंह, जोरावर सिंह आणि फतेह सिंह हे २१ ते २७ डिसेंबर १७०४ या कालावधीमध्ये शहीद झाले. देश आणि धर्मासाठी स्वतःचे बलिदान करणाऱ्या या चार चिरंजीवांचे स्मरण म्हणून खोपोलीतील स्वामी प्रेरणा सामाजिक सेवा संस्थे तर्फे ब्राह्मण सभा सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी खोपोली गुरुद्वारा कमिटीचे सेक्रेटरी चरणजीत सिंग सैनी, वीरेंद्र सिंग, इंद्रपालसिंग कोहली, अश्विनी कुमार चंदेल, अविनाश मोरे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी प्रेरणा सेवा संस्थेचे अध्यक्ष राकेश पाठक होते.

प्रास्ताविक प्रशांत शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन कृष्णा जंगले यांनी केले तर आभार उपेंद्र करमरकर यांनी मानले. ब्राह्मण सभेचे अध्यक्ष राजेंद्र पेठे, उपेंद्र करमरकर, देवेंद्र जाखोटिया, हरमिंदर सिंग सोहल, मलकित सिंग,राजीव मुळेकर,शिवराम गोयल, अतुल कोठारी, तालुका कार्यवाह गौरव तटकरे, संतोष गंदेवार, माधवी कुवळेकर ,रुपेश मिस्त्री, रवींद्र जैन, रोहित कुलकर्णी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



## श्रीवर्धनमध्ये आज आढावा बैठक

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. २९) दुपारी २.३० वाजता श्रीवर्धन विश्रामगृह येथे विविध विकासकामांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला सर्व शासकीय अधिकारी, राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती अपेक्षित आहे.

खासदार सुनील तटकरे यांचे मार्गदर्शन आणि जिल्ह्याच्या विकासासंबंधी कटिबद्धतेमुळे श्रीवर्धन तालुक्याचा विकास गती घेत आहे. या बैठकीला खासदार तटकरे यांचे पुन्हा एकदा नेतृत्व प्राप्त झाल्याने विकासकामांच्या गतीत आणखी भर पडली आहे तसेच श्रीवर्धन मतदारसंघाची आमदार आदिती तटकरे यांचे योगदानदेखील महत्त्वपूर्ण आहे. आढावा बैठकीत शासकीय कामाच्या अडचणी आणि समस्यांची तपासणी केली जाईल. कोणती कामे शिघ्र गतीने पूर्ण होऊ शकतात आणि कोणत्याही गडबडीची अथवा हलगर्जीची शंका असलेल्या कार्यांना त्वरित हाताळले जाईल.

# वडगाव शाळेत क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा यांचे आयोजन वडगाव शाळेच्या सुंदर आयोजनामुळे स्पर्धा आनंददायी व यशस्वी वातावरणात पार पडल्या.

गट शिक्षण अधिकारी कैलास चोरमले, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग शिक्षण विभाग (प्राथ.) तर्फे शिक्षण विभाग पंचायत समिती खालापूर च्या क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा रायगड जिल्हा परिषदेची ग्रामीण उत्कृष्ट व मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा २, रायगड जिल्हा प्रथम व मुंबई विभाग द्वितीय शाळा वडगाव च्या प्रांगणात आनंददायी व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. या स्पर्धेसाठी खालापूर,चौक व वावोशी बिटाचे प्रत्येकी १६ संघ असे एकूण ४८ संघात या स्पर्धा पार पडल्या. या वेळी बेचकी,लगोरी,माती शिल्प,दोरी उड्या, लंगडी सह सांघिक नृत्य, समुहगीत गायन,पथनाट्य या आठ प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यातील प्रथम क्रमांक जिल्ह्याच्या स्पर्धांमध्ये खेळवला जाईल.

या स्पर्धेत वडगाव शाळेने पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करत लहान गट समुह गीत तालुक्यात प्रथम, तर मोठा गट द्वितीय व माती शिल्प तृतीय क्रमांक पटकावला तसेच रसिका, धनश्री या विद्यार्थिनींनी लंगडी गटात आपला ठसा उमटवला आहे. या वेळी वडगाव शाळेचे व शाळा व्यवस्थापन समितीचे विभागीय पारितोषिक मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट आयोजना बद्दल सन्मानचिन्ह देऊन वडवळ शाळेचे सुधाकर थळे, वडगावचे सुभाष राठोड यांचा गौरव करण्यात आला.

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगावकडून सर्व विद्यार्थी शिक्षकांना भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती,तर ज्यूबिलियंट कडून अल्पोपहार देण्यात आला. खालापूर बिटातील विनोद लंके यांनी केळी वाटप केले. कार्यक्रमास परीक्षक म्हणून



रिलायन्स शाळेचे राऊत, जनता मोहपाडा शाळेचे अभंगे यांनी काम पाहिले.

या कार्यक्रमात गटशिक्षणाधिकारी कैलास चोरामले, वरिष्ठ विस्तार अधिकारी वरिष्ठ शिल्पा दास, शालेय पोषण आहार अधीक्षक दिपा परब, माजी उपसरपंच ग्रुप ग्राम पंचायत वडगाव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा करुणा ठोंबरे, उपाध्यक्षा राजश्री जांभुळकर, केंद्र प्रमुख देविदास पाडवी, किशोर परदेशी, जगतसिंग परदेशी, संतोष पाटील, जयंत पाटील, हेमंत म्हात्रे, साधन व्यक्ती नरेश पाटील, योगेंद्र म्हात्रे व कार्यालयातील संपूर्ण अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी व्यासपीठ व ईतर सुविधा नरेश जांभुळकर यांनी केली, तर उत्तम सूत्र संचालन चौक शाळेच्या आरती नाईक यांनी केले. पारितोषिक वितरण व आभार सुभाष राठोड यांनी पार पाडले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मोहन दहिफळे, रवींद्र घोगरे, अतुल पाटील,रजनी गायकवाड, सुनीता म्हात्रे व सर्व शिक्षकांनी व वडगाव शाळेचा संपूर्ण स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

# नितीश-वॉशिंग्टनची झुंझार खेळी

## भारत तिसऱ्या दिवसाअखेर ९ बाद ३५८ धावा

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

बॉर्डर-गावसकर ट्रॉफीसाठी सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील चौथ्या सामन्यात भारतीय आघाडीच्या फळीतील स्टार फलंदाजांच्या ढिसाळ कामगिरीमुळे टीम इंडिया पुन्हा अडचणीत सापडली होती, पण दबावात तळाच्या फलंदाजीत नितीश कुमार रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी केलेल्या दमदार शतकी भागीदारीच्या जोरावर संघाने तिसऱ्या दिवसाअखेर धावफलकावर ९ बाद ३५८ धावा लावल्या आहेत.

वॉशिंग्टन सुंदर अर्धशतकी खेळी करून माघारी फिरल्यावर नितीश कुमार रेड्डीने आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिल शतक झळकावले. अंधूक प्रकाशामुळे खेळ नियोजित वेळेआधीच थांबला. त्या वेळी नितीश १७६ चेंडूत १० चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने १०५ धावांवर खेळत होता. दुसऱ्या बाजूला मोहम्मद सिराज ७ चेंडूचा सामना करून २ धावांवर खेळत होता. भारताने फॉलोऑन टाळला असला तरी अजूनही संघ ११६ धावांनी पिछाडीवर आहे.



युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल सोडला तर अन्य एकालाही ऑस्ट्रेलियन गोलंदाजांसमोर मैदानात तग धरता आला नाही. दुसऱ्या दिवशीच्या खेळात भारतीय संघाने अवघ्या १६४ धावांत अर्धा संघ तंबूत परतला होता. तिसऱ्या दिवशी ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा या भारतीय जोडीने ५ बाद १६४ धावांवरून खेळ पुढे नेण्यास सुरुवात केली, पण धावफलकावर २०० धावा लागण्याआधीच पंत २८ (३७) बाद झाला. जडेजाच्या रुपात संघाने २२१ धावांवर सातवी आणि तिसऱ्या दिवसांतील दुसरी विकेट गमावली.

भारतीय संघाच्या धावफलकावर ७ बाद २२१ अशी धावसंख्या असताना तळाच्या फलंदाजीत नितीश कुमार रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर या जोडीने सर्वोत्तम कामगिरीचा नजराणा पेश केला. या दोघांनी मैदानात तग धरून केलेली खेळी आघाडीच्या फ्लॉप ठरलेल्या फलंदाजांनी धडा देणारी आहे. नितीशने वॉशिंग्टनच्या आठव्या विकेटसाठी १२७ धावांची बहुमूल्य भागीदारी रचली. या दरम्यान वॉशिंग्टनने कसोटीतील आपले चौथे अर्धशतक झळकावले. नितीशने ऑस्ट्रेलिया दौऱ्यातूनच टीम इंडियात एन्ट्री मारली होती. मेलबर्नच्या मैदानातील सेंच्युरीसह त्याने आपल्यातील प्रतिभा दाखवून दिली आहे.



## जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत बलाढ्य हाशिवरे संघावर 'वायदूत'ने केली मात

**पनवेल : वार्ताहर**

उरण द्रोणागिरी येथे झालेल्या जिल्हास्तरीय महोत्सवानिमित्त आयोजित खो-खो स्पर्धेत महिला खुल्या गटामध्ये वायुदूत क्रीडा केंद्र कळंबोलीच्या संघाने बलाढ्य महात्मा गांधी हाशिवरे संघाचा दोन गुणांनी पराभव केला. विशेष म्हणजे या संघाची १७ वर्षांची जुनी विजयाची परंपरा वायदुतने मोडीत काढली.

वायुदूत क्रीडा केंद्र संघाकडून खेळताना मृदुला पुकळे हिने २.०० मी., १.४० मी. व १.३० संरक्षण करून आक्रमणामध्ये एकूण ३ गडी बाद केले. संजीवनी जगदाळे हिने संरक्षण करताना १.०० मी, १.२० मी व ३ मी. पळतीचा खेळ करून आक्रमणात एकूण ७ गडी बाद केले. प्रज्ञा गाडे हिने २.१० मी, व २.०० मी संरक्षण करताना आक्रमणात एकूण ६ गडी बाद केले. वैष्णवी थोरात हिने २.२० मी, व १.४० संरक्षण करून ३ गडी बाद केले. त्याचप्रमाणे निहारिका मुंढे, तेजल कवठे, पलक मिठारे, समृद्धी हांडे, अर्पिता सावरकर, स्वराली हांडे, आश्लेषा काशीद, व स्वप्ना जगदाळे या खेळाडूंनी मोलाची साथ दिली. विजयाच्या शिल्पकार होत्या श्रेया पोळ व वैष्णवी जगदाळे, ज्यांनी अप्रतिम खेळ करून संघाला विजय मिळवून दिला.

या स्पर्धेत सर्वोत्तम आक्रमक म्हणून कळंबोली संघाची संजीवनी जगदाळे, संरक्षक हाशिवारे संघाची खेळाडू भूमी पाटील व मृदुला पुकळे अष्टपैलू खेळाडू असा गौरव करण्यात आला. प्रशिक्षक हर्षद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींनी उत्तम कामगिरी करत जिल्ह्यामध्ये वायुदूत क्रीडा केंद्राचे नाव उंचावले आहे. मुख्य मार्गदर्शक सुधीर पाटील, तेजस जाधव, संग्राम देशमुख, अमित साळुंके, अभिजित खताळ व भाग्यश्री देवकर यांनी खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## एक सामना, अनेक विक्रम!

### २१ वर्षीय नितीशने मेलबर्नचे मैदान गाजवले



**मेलबर्न : वृत्तसंस्था**

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया चौथ्या कसोटीत अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीने शानदार कामगिरी केली आहे. ऐतिहासिक मेलबर्न क्रिकेट ग्राउंड (एमसीजी) मध्ये बॉक्सिंग डे कसोटी सामन्यात २१ वर्षीय खेळाडूने आपले पहिले आंतरराष्ट्रीय कसोटी शतक झळकावले. नितीशने त्याच्या या खेळीने अनेक विक्रमांची मालिका रचली आहे.

आपल्या पहिल्याच ऑस्ट्रेलिया दौऱ्यात नितीशने अप्रतिम पराक्रम केला आहे. ऑस्ट्रेलियात पहिले कसोटी शतक झळकावणारा तो तिसरा सर्वात तरुण भारतीय खेळाडू ठरला आहे. त्याने वयाच्या २१ वर्षे २१६ दिवसांत ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर शतक झळकावण्याचा पराक्रम केला. त्याने दत्तू फडकरला मागे टाकले, ज्याने १९४८मध्ये ॲडलेडमध्ये वयाच्या २२ वर्षे ४६ दिवसांत कसोटी शतक झळकावले होते. यात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर अग्रस्थानी आहे. त्याने १८ वर्षे २५६ दिवसांत सिडनीत १९९२मध्ये शतक ठोकले होते.

ऑस्ट्रेलियात आठव्या किंवा त्याखालील क्रमांकावर फलंदाजी करताना शतक ठोकणारा नितीश पहिला भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे. त्याने २००८मध्ये ॲडलेड कसोटीत ८७ धावा करणाऱ्या अनिल कुंबळेला मागे टाकले.

नितीश आणि सुंदर या जोडीने ऑस्ट्रेलियात आठव्या विकेटसाठी दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च भागीदारी करण्याचा भारतीय विक्रम केला आहे. या दोघांनी २००८मध्ये १२७ धावांची भागीदारी करणारा कुंबळे आणि हरभजन सिंगचा विक्रम मोडला. ऑस्ट्रेलियामध्ये कसोटी डावात भारताच्या आठव्या आणि नवव्या फलंदाजांनी ५० प्लस स्कोअर बनवण्याची ही दुसरी वेळ आहे.

**'पुष्पा'नंतर 'बाहुबली' सेलिब्रेशन चर्चेत**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध एमसीजी कसोटीदरम्यान नितीश कुमार रेड्डीची फिल्मी शैलीही पहायला मिळाली. अर्धशतक झळकावल्यानंतर त्याने 'पुष्पा' स्टाईलमध्ये सेलिब्रेशन केले, तर त्याने 'बाहुबली' स्टाईलमध्ये शतक साजरे केले. त्याचा हा फिल्मी लूक चाहत्यांना आवडला आहे.

## कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत अलिबागच्या आवास संघाचा दबदबा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील वाड्गाव येथे झालेल्या तालुका अजिंक्यपद निवड चाचणी कुस्ती स्पर्धेत आवासच्या श्री काळभैरव तालीम संघाने नेत्रदीपक खेळाचे प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली.

या स्पर्धेत आवास येथील बाबासाहेब नाजरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे माजी माजी प्राचार्य प्रमोद भगत यांच्या मार्गदर्शनातून घडलेल्या पैलवानांच्या संघाने सुयश संपादन केले. यामध्ये हौशी गट मुलींमध्ये समीक्षा पाटील, मीरा पाटील प्रथम, मुलांमध्ये पवन मांजी प्रथम; सब ज्युनिअर गटात मुलांमध्येनिशाल कुमार मांझी व प्रणव म्हात्रे प्रथम; महिला वरिष्ठ गटात युक्ता मढवी व मनीषा गुरूम प्रथम; केसरी महिला गटात सुरक्षा थळे प्रथम; वरिष्ठ गट पुरुष माती विभागात शुभम म्हात्रे व अंश धोंडसेकर यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. आयोजकांच्या वतीने यशस्वी पैलवानांना पदक व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

या यशाबद्दल प्रशिक्षक प्रमोद भगत, माजी पं.स. सदस्य रणजीत राणे, सरपंच अभिलाषा राणे, माजी सरपंच व विद्यमान सदस्य अभिजीत राणे, उपसरपंच राजेंद्र वाकडे, सर्व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य यांनी यशस्वी कुस्तीपटूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## एम.बी. मोरे शिक्षण संकुलात वार्षिक क्रीडा स्पर्धा



**रोहे : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाउंडेशनच्या रोह्याच्या धाटाव येथील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय येथे वार्षिक क्रीडा स्पर्धा चार दिवस रंगली. यामध्ये विविध खेळांत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे संचालक अशोक मोरे, रोहा तालुका क्रीडा समन्वयक रूपेश रटाटे आणि इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका तेजल सावंत यांच्या उपस्थितीत पार पडले.

पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रत्येक क्रीडा प्रकारातील विजेत्यांना प्रमाणपत्र आणि पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेचे नियोजन महाविद्यालय क्रीडा समिती समन्वयक प्रा. नरेश घाग, प्रा. मयुर पाखर, शिक्षिका स्नेहल कसबले यांनी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह केले होते.

## ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूने विराटची माफी मागितली

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात मेलबर्नमध्ये बॉर्डर-गावसकर ट्रॉफीचा चौथा कसोटी सामना सुरू आहे. सामन्यादरम्यान ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज केरी ओ'कीफेने विराटची माफी मागितली.

विराट आणि ऑस्ट्रेलियाचा युवा सलामीवीर सॅम कॉन्स्टन्स यांच्यातील संघर्षानंतर केरी ओ'कीफने सामन्यादरम्यान एक टिप्पणी केली होती. तो म्हणाला की, विराटने अहंकारातून कारकीर्द घडवली आहे. त्याने एका नवोदित खेळाडूला पाहिले आणि हे रिसेट करण्यास सुरुवात केली. यानंतर या ऑस्ट्रेलियन खेळाडूला टीकेला सामोरे जावे लागले. अखेर ओ'कीफला आपली चूक लक्षात आली. त्याने माफी मागत म्हटले की, विराटच्या वागण्याला उद्धट म्हटल्याबद्दल मला माफ करा. मी असे बोलायला नको होते. त्याच्यात एक स्वॅग आहे आणि तो त्याच पद्धतीने क्रिकेट खेळतो. मला वाटते जेव्हा त्याने दुसरा खेळाडू पाहिला, ज्याच्यात त्याचासारखा स्वॅग आहे, तेव्हा तो थोडासा चिडला आणि त्याने त्याच प्रकारे उत्तर दिले.

### कॅम्पोलियन क्लब टी-२० क्रिकेट स्पर्धा

## अलिबाग, महाड, पेण संघ उपांत्य फेरीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित कॅम्पोलियन क्लब टी-२० निवड चाचणी नॉक आऊट क्रिकेट स्पर्धेचा थरार सध्या सुरू आहे. ही स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आली आहे. एसीसी अलिबाग, पेण स्पोर्टस् असोसिएशन, रायगड राजे पेण व एसबीसी महाड अशे चार संघ उपांत्य फेरी पोहचले आहेत.

या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील ३२ संघांनी सहभाग घेतला होता. जिल्ह्यातील विविध मैदानावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आहे.उपांत्य फेरीचे व स्पर्धेचा अंतिम सामना पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर होणार आहे. पहिला उपांत्य फेरीचा सामना पेण स्पोर्ट्स असोसिएशन विरूद्ध रायगड राजे पेण तर दुसरा उपांत्य फेरीचा सामना एसीसी अलिबाग विरूद्ध एसबीसी महाडच्या संघात रंगणार आहेत.शनिवार २८ व रविवार २९ डिसेंबर रोजी सदरच्या मॅचेस होणार आहेत. स्पर्धेत खेळाडूने केलेल्या कामगिरीच्या आधारावर रायगड जिल्हाचा संघ निवडला जाणार असून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित होणाऱ्या आंतर जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल.

### जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

## श्री गणेशकृपा, हिंद केसरी, शिवनेरी स्पोर्टस्, आंबेवाडी संघ तिसऱ्या फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री गणेशकृपा, हिंद केसरी, शिवनेरी स्पोर्टस्, आंबेवाडी यांनी मुंबई शहर कबड्डी असोसिएशनने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत पुरुष द्वितीय श्रेणी गटात तिसरी फेरी गाठली. वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिरात स्पर्धा खेळली जात आहे.

पुरुषांच्या सामन्यात श्री गणेशकृपाने पूर्वार्धातील १०-१२ अशा पिछाडीवरून अमरदीप मंडळाचा प्रतिकार २३-२१ असे मोडून काढले. श्रीकांत मोरे, आदेश जांगली यांच्या चढाई पकडीच्या संयमी खेळामुळे गणेशकृपाचा हा विजय शक्य झाला. अमरदीपच्या प्रसाद सिंह, कुणाल खारगावकर यांचा खेळ उत्तरार्धात थोडा कमी पडला.

दुसऱ्या सामन्यात हिंद केसरी मंडळाने श्रीराम स्पोर्टस्चा विरोध ३३-२९ असा संपविला. प्रणव वाडकर, रोहित तळेकर यांनी पहिल्या डावात आक्रमक खेळ करीत हिंद केसरीला २१-०९ अशी आघाडी घेतली होती, पण सुर सापडलेल्या श्रीरामच्या किरण खोत, भावेश गायकर यांनी आपला खेळ गतिमान करीत हिंद केसरीचा चांगलीच टक्कर दिली, मात्र विजयापासून ते दूरच राहिले.

शिवनेरी स्पोर्टस्ने ऋषीमुनी स्पोर्टस्ला २८-१९ असे नमवित आगेकूच केली. मध्यांतराला १६-१० अशी आघाडी शिवनेरीकडे होती. साहिल आवळे, दीपक मोरे शिवनेरीकडून, तर श्रेयस आंबोपकर ऋषीमुनीकडून उत्कृष्ट खेळले.

आंबेवाडी मंडळाने श्री साई क्लबचा ३३-२६ असा पराभव केला. विश्रांतीला १६-१० अशी आघाडी आंबेवाडी कडे होती. विश्रांतीनंतर मात्र सामन्यात रंगतदार क्षण पहावयास मिळाले. ऋषिकेश शिंदे, यश माचिवले आंबेवडीच्या विजयात चमकले. तेजस गायकवाड, वेदांत वारीसे यांनी श्री साई क्लबकडून दुसऱ्या डावात कडवी लढत दिली.

## ऋषभ पंतच्या शॉट सिलेक्शनवर गावसकर संतापले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मेलबर्न कसोटीत भारतीय संघ पहिल्या डावात अडचणीत सापडला आहे. तरीही ऋषभ पंतने आपले कुटील फटके खेळणे सोडले नाही. ही पद्धत त्याला महागात पडली व त्यामुळे तो २८ धावा करून बाद झाला. या चुकीमुळे पंतला सोशल मीडियावर ट्रोल केले जात आहे. यासोबतच भारतीय दिग्गज सुनील गावस्कर यांनीही त्याच्यासाठी 'इडियट' हा शब्द वापरला.

मेलबर्न कसोटीत तिसऱ्या दिवशी ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजाने भारतीय डावाला १६४ धावांपर्यंत मजल मारली. पंत-जडेजा चेंडूला मधोमध करत होते आणि त्यांच्या भागीदारीमुळे ऑस्ट्रेलियन गोलंदाजांच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसत होती. पण क्रीझवर सेट असूनही पंत त्याची विकेट ऑस्ट्रेलियाला फुकटात देईल. हे कोणाला माहीत होते. स्कॉट बोलँडच्या चेंडूवर रॅम्प शॉट मारण्यात तो एकदा अपयशी ठरला होता, पण पुढच्याच चेंडूवर त्याने तीच चूक पुन्हा केली आणि नॅथन लियॉनने त्याचा झेल घेतला. त्याने २८ धावा केल्या.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. —मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com